सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पीएम मोदींसमोर डोनाल्ड ट्रम्प यांनी ठेवला चीनबद्दलचा प्रस्ताव, पण भारताने दिला नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४वाशिंग्टन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात भारत-अमेरिकेशी संबंधित अनेक विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशातील व्यापार दुप्पट करण्यावर जोर देतानाच इतर क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. याच बैठकीत अध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींसमोर एक प्रस्ताव ठेवला, ज्याला भारताने नकार दिला.



पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष ट्रम्प यांच्यात भारत-चीन सीमावादाच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. याबद्दल भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून सांगण्यात आले की, अशा मुद्द्यावर भारताची दृष्टिकोण नेहमी द्विपक्षीय राहिला आहे. वॉशिंग्टन डीसी येथे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये ट्रम्प यांनी चीनसंदर्भातील प्रस्ताव ठेवला. मी भारताकडे बघतो. भारत-चीन सीमेवर भयंकर चकमकी बघायला मिळतात आणि मला असे वाटते की असेच चालत राहील. हे सगळे थांबवण्यासाठी जर मी काही मदत करू शकलो, तर मला खूप आनंद होईल. हे खूप काळापासून चालू आहे, जे खूपच हिंसक आहे.अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांचा प्रस्ताव भारताने फेटाळून लावला. भारताचे परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितले की, यासंदर्भात भारताची भूमिका द्विपक्षीयच राहिलेली आहे.आमचे कोणत्याही शेजारी राष्ट्रासोबत जे काही मुद्दे आहेत, ते आम्ही द्विपक्षीय चर्चेतून सोडवू असे विक्रम मिस्त्री यांनी स्पष्ट केले.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वी दिला होता प्रस्ताव**

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी या मुद्द्यावर मध्यस्थी करण्याचा प्रस्ताव देण्याची ही पहिलीच वेळ नाही. ट्रम्प यांनी त्यांच्या पहिल्या कार्यकाळात भारत-चीन आणि भारत-पाकिस्तान या दोन्ही सीमावादाच्या मुद्द्यावर मध्यस्थी करण्याचा प्रस्ताव दिला होता. डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेन आणि रशियातील युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याचबरोबर गाझा पट्टीत सुरू असलेला इस्रायल-हमास संघर्ष थांबवण्यातही मध्यस्थी केली आहे. त्यानंतर आता ट्रम्प यांनी भारत-चीन सीमावादात मध्यस्थी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

## २६/११ला आता खरा न्याय मिळेल मुख्यमंत्री फडणवीसांना विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत काय झाले, बैठकीत काय चर्चा झाली, याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली. पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी अनेक मुद्द्यांवर स्पष्ट शब्दांत भाष्य केले.




पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सन २००८ मध्ये मुंबईवर झालेल्या २६/११ हल्ल्याच्या आठवणींची जखमी प्रत्येक मुंबईकरांच्या मनात आहे. शेकडो निरपराध्यांचे प्राण घेणाऱ्या या हल्ल्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा तहव्वूर राणा या दहशतवाद्याला भारताच्या ताब्यात देण्यास अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंजुरी दिली आहे. २६/११चा अपराधी, मास्टरमाइंड तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणासाठी अमेरिकेने होकार दिला आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. यासाठी अमेरिकी प्रशानसाला तयार केले. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानतो. मागच्या काळात आम्ही प्रयत्न करून त्याची ऑनलाइन साक्ष मिळवू शकलो, त्यामुळे पाकिस्तानचा या हल्ल्यातील हात असल्याचे दाखवू शकलो. तो भारताचा अपराधी आहे, त्यामुळे भारताला तो अपराधी म्हणून उपलब्ध झाला पाहिजे. त्याला शिक्षा देता आली पाहिजे, अशी आपली मागणी होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ती मागणी रेटली आणि तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाला मान्यता मिळाली आहे. २६/११ ला आता खरा न्याय मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या झालेल्या भेटीबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जे तीन नवे कायदे तयार झाले आहेत, त्या तिन्ही कायद्यांसंदर्भात एक आढावा बैठक अमित शाह यांनी घेतली. हे तीन कायदे तयार झाल्यानंतर राज्यामध्ये त्याची अंमलबजावणी कशी झाली आहे? त्याकरिता ज्या इन्स्टिट्युशन्स आणि इन्फ्रास्ट्रक्चर तयार करायचे होते. त्याची तयारी किती झाली आहे? किती केस रजिस्टर झाल्या त्याची माहिती घेतली.

## भाडेकरार आता मराठीतून पंधरवड्यात राज्यात कोठूनही करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ पुणे**

ऑनलाइन भाडेकरार आता राज्यभरातून कुठूनही नोंदविता येणार असून, त्यासाठी भाडेकरार २.० ही प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर पुणे जिल्ह्यात १७ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात येत आहे. हा भाडेकरार आता मराठीतून उपलब्ध करून देण्यात आला असून, पक्षकारांची माहिती आधार क्रमांकाद्वारे थेट आधार पोर्टलवरूनच घेण्यात येणार असल्याने फसवणुकीचे प्रकार टळणार आहेत. येत्या पंधरवड्यात ही प्रणाली सबंध राज्यभर लागू करण्यात येणार आहे.




ऑनलाइन भाडेकरारासाठी 'भाडेकरार १.९' ही संगणक प्रणाली वापरली जात आहे. गेल्या वर्षभरात राज्यात १३ लाख १० हजारांहून अधिक जास्त भाडेकरार ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्यात आले आहेत. सध्या नागरिकांचा ऑनलाइन भाडेकरार करण्याकडे कल वाढला आहे. पुणे, ठाणे, मुंबई, नागपूर या विभागात भाडेकरारांची विक्रमी दस्त नोंदणी होत असते. त्यामुळे या प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी; तसेच अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी २.० ही अद्ययावत संगणक प्रणाली तयार करण्यात आली आहे.त्यातील काही त्रुटींची दुरुस्ती करून आता भाडेकरार २.० ही नवीन संगणक प्रणाली अस्तित्वात आली आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे जिल्ह्यात ही प्रणाली १७ फेब्रुवारीपासून अमलात येणार आहे. त्यातील त्रुटी लक्षात घेऊन येत्या पंधरवड्यात ही प्रणाली सबंध राज्यभर उपलब्ध करून दिली जाणार आहे. या प्रणालीमुळे राज्यात एका ठिकाणाहून अन्य जिल्ह्यांत भाडेकरार ऑनलाईन करता येणार आहे, अशी माहिती राज्याचे नोंदणी उपमहानिरीक्षक (माहिती तंत्रज्ञान) अभयसिंह मोहिते यांनी दिली.

या प्रणालीत भाडेकरार आता मराठीत उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच भाडेकरारासाठीचे शुल्क भरण्यासाठी याच पोर्टलवरून क्युआर कोडचा वापर करून 'पे टू आयजीआर' या प्रणालीचा वापर करता येणार आहे. पक्षकारांचे आधार क्रमांक यात टाकल्यानंतर त्यांची सबंध माहिती आधार पोर्टलवरूनच मिळविली जाणार आहे. यातून फसवणुकीचे प्रकार टळणार आहेत. या प्रणालीत सुरक्षेसंदर्भातील उपाय अधिक कडक करण्यात आल्याने विभागाला तसेच पक्षकारांना देखील फसवणुकीचे प्रकार टाळता येणार आहेत.

## कॉपीमुक्त अभियानाचा 'विशाल नरवाडे' पॅटर्न महाराष्ट्रभर जाणार, शुन्य रुपये खर्चात अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४पुणे**

येथील २०२२ ला आयएएस अधिकारी विशाल नरवाडे हे प्रशिक्षणार्थी तहसीलदार काम पाहताना त्यांनी शून्य रुपये खर्चात पहिल्यांदाच कॉपी मुक्त अभियानचा विशाल नरवाडे पॅटर्न तालुक्यातील परिक्षा केंद्रावर राबविला होता. याची दखल घेऊन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली. यात यावर्षी कॉपीमुक्त परीक्षेसाठी 'विशाल नरवाडे' पॅटर्न राज्यभर राबविण्याचे आदेश दिले आहेत.

गतवर्षी विशाल नरवाडे बुलढाणा येथेही जिल्ह्यात प्रथमच जिल्हा प्रशासनाने बारावी आणि दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी अभिनव कॉपीमुक्ती अभियान राबवले होते. याची दखल घेऊन महाराष्ट्रामध्ये कॉपी मुक्त अभियानचा विशाल नरवाडे पॅटर्न राज्यभर राबविण्याचा आदेश मुख्य सचिवांनी दिला आहे.


१० वी व १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा मार्चपर्यंत राज्यभर चालणार आहेत. बहुतांश ठिकाणी राज्यभर परीक्षेदरम्यान गैरमार्गाने कॉपी करणे सर्वत्र कमी जास्त प्रमाणात दिसून येते. या संदर्भात 'कॉपीमुक्त परीक्षा' घेणे प्रशासनासमोर नेहमीच आव्हान असते. कॉपीच्या प्रकरणांवर कारवाई करण्यासाठी महसूल पथक, पोलिस पथक, बैठे पथक, भरारी पथके अशी यंत्रणा सध्या कार्यरत आहे. परंतु परीक्षा एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी असल्याने सर्व विभागांचे इतके मनुष्यबळ उपलब्ध करून देणे प्रशासनासाठी आव्हानात्मक बनले आहे. या संदर्भात विशाल नरवाडे यांनी कॉपीमुक्त परीक्षा आयोजित करण्यासाठी नवीन मॉडेल तयार केले आहे. यासाठी मुख्य सचिव सौनिक यांची बैठक झाली यावेळी राज्यातील क्षेत्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून सूचना आणि सर्वोत्तम पद्धती विचारल्या गेल्या. त्यानुसार मुख्य सचिवांनी तंत्रज्ञानाच्या वापराचे कौतुक करत यंदाच्या वर्षी कॉपीमुक्त परीक्षेसाठी 'विशाल नरवाडे' पॅटर्न राज्यभर राबविण्याचे आदेश दिले.

## भिकारी सुद्धा एक रुपया घेत नाही पण आम्ही १ रुपयांत पीकविमा दिला : कृषिमंत्री कोकाटे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

हल्ली भिकारीही एक रुपया घेत नाही. पण आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयांत पीकविमा दिला, काही लोकांनी त्याचा गैरवापर केला. ही योजना यशस्वी व्हावी व त्याचा योग्य लाभ शेतकऱ्यांना मिळावा असा आमचा प्रयत्न आहे. पीकविमा योजनेविषयी सरकारच्या गाठिशी चांगले - वाईट अनुभव आहेत. पण ही योजना सरकारला कोणत्याही स्थिती बंद करायची नाही, असे वक्तव्य राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी येथे केले.

शेतकऱ्यांसंदर्भात केलेल्या त्यांच्या या विधानाने वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा यांच्या वतीने येथील कृषी विकास परिषद व प्रदर्शनीचे उद्घाटन कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. तत्पुर्वी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी पीक विमा घोटाळ्याविषयी संताप व्यक्त केला.माणिकराव कोकाटे म्हणाले, हल्ली भिकारी देखील एक रुपया घेत नाही. आम्ही शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना लागू केली. ही योजना चांगली आहे. त्यामुळे या



योजनेला चांगला प्रतिसाद देखील मिळाला. पण, या योजनेलाही गैरव्यवहाराचे ग्रहण लागले. यामुळे सरकार अडचणीत आलेले नाही, पण यातून आता काही सुधारणा निश्चितपणे कराव्या लागणार आहेत. ही योजना सरकारला कोणत्याही स्थिती बंद करायची नाही. त्यात सुधारणा करायची आहे. या प्रकरणी गैरप्रकार टाळण्यासाठी काही ठोस निर्णय घ्यावे लागतील. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीत याविषयी योग्य तो निर्णय घेतला जाईल.माणिकराव कोकाटे म्हणाले, सद्यस्थितीत पीक विम्याचे ४ लाख अर्ज नामंजूर करण्यात आलेत. सरकार या प्रकरणी कुठेही अडचणीत नाही. अर्जदार व एजन्सी चालकांच्या चुकांमुळे असे घडले असावे असा माझा अंदाज आहे. त्याची चौकशी सुरू आहे. या प्रकरणी योग्य ती कारवाई केली जाईल.

पण यात सुधारणा करण्याची गरज आहे.कृषी विभागात सध्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे आकृतीबंध तयार करून भरती करण्याचा विचार करत आहे. एवढेच नाही तर शेतकऱ्यांना कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधता यावा यासाठी त्यांना एका विशेष सिरीजचे क्रमांक देण्याचाही आमचा प्रयत्न आहे. या प्रकरणी कृषी मंत्र्यांपासून शेवटच्या कर्मचाऱ्यापर्यंत एक कायमस्वरुपी नंबर असेल, अशी माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली.

## 'एक राज्य, एक नोंदणी' मुंबईतून १७ पासून अंमलबजावणी, महिन्यात राज्यभरात होणार लागू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

राज्यातील एका ठिकाणचा दस्त अन्य कोणत्याही जिल्ह्यात नोंदविता येण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली 'एक राज्य, एक नोंदणी' ही पद्धत प्रायोगिक तत्त्वावर मुंबई शहर व उपनगर या दोन जिल्ह्यांत लागू करण्यात येत आहे. येत्या १७ फेब्रुवारीपासून याची अंमलबजावणी होणार असून, महिनाभरात सबंध राज्यभर ही योजना लागू करण्याचा नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचा मानस आहे.




राज्यात सध्या एका जिल्हा सहनिबंधक कार्यालयाच्या अखत्यारित असलेल्या खरेदी-विक्रीच्या दस्तांची नोंदणी त्याच सहनिबंधक कार्यालयांमध्ये केली जाते. अनेकदा बाहेरील जिल्ह्यातील खरेदीदार दुसऱ्या जिल्ह्यात जमीन, घर खरेदीचे व्यवहार करतात. अशांना संबंधित जिल्हा सहनिबंधक कार्यालयात जाऊन व्यवहार पूर्ण करावे लागतात. यातून मार्ग काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर शंभर दिवसांत 'एक राज्य, एक नोंदणी' असा उपक्रम राबविण्याचे जाहीर केले. त्यानुसार नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने यासंदर्भात तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यास सुरुवात केली आहे.

हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राज्यात लागू केला जाणार आहे. आर्थिक वर्ष संपत आल्याने मार्चअखेरपर्यंत दस्तनोंदणींची संख्या जास्त असते. तसेच यंदा रेडीरेकनर दरांत वाढ होण्याचे संकेत असल्याने दस्तांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे मुंबई वगळता राज्यात हा निर्णय येत्या महिनाभरात लागू होण्याची शक्यता आहे.

## जे राहिलेत ते पण येतील; साळवींनंतर ठाकरे गटाला आणखी गळतीचे शिंदेंकडून संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जे राहिले आहेत. ते पण येतील. शिवसेनेत इनकमिंग चालू आहे आणि ते चालूच राहणार आहे. असा गौप्यस्फोट एकनाथ शिंदेंनी केला. अखेर ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी आमदार राजन साळवी यांनी शिंदेंच्या शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला आहे. आज दुपारी उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्ष



प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला आहे. यावेळी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये शिंदे बोलत होते.

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून जेजे नेते शिवसेनेमध्ये येत आहेत. त्यांचं शिनसेनेतील नेते स्वागत करत आहेत. तसेच उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जे राहिले आहेत. ते पण येतील. शिवसेनेत इनकमिंग चालू आहे आणि ते चालूच राहणार आहे. तसेच कोकणातील अनेक लोक शिवसेनेत येणार आहेत. त्यांचं देखील स्वागत आहे. असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या पक्षाला आणखी गळती लागणार आहे असे संकेत दिले आहेत. त्याचबरोबर पुढील प्रवेश कुणाचा हा प्रश्न मात्र अनुत्तरित आहे.

## संपादकीय ......

# प्रेमदिनाचा प्रेमसंदेश

पुन्हा एकदा ऋतूबदलांचे प्रहर आणि मनाची संभ्रमित अवस्था. दिवसा वाहणारे थंड आणि शीतल वारे उन्हाचा तडाखा जाणवू देत नाहीत. याच काळात येतो तो जगभरातील समस्त तरुणाईने लोकप्रिय केलेला व्हॅलेंटाईन डे अर्थात प्रेमदिन! गेल्या काही वर्षांपासून या दिवसाला एक वेगळं आणि अनन्यसाधारण महत्त्व लाभलेलं आहे.

कुणा एका पाश्चात्त्य संताच्या इच्छेनुसार त्याचा जन्मदिवस हा प्रेमदिवस म्हणून जगभरात साजरा करावा, किती रम्य कल्पना! म्हणतात 'इफ यू लव्ह समबडी, लेट देम नो!' मग काय? त्या संताला कदाचित हे माहीत असावं. म्हणूनच त्यांनी आपला जन्मदिवस हा प्रेमदिवस म्हणून साजरा करावा, अशी इच्छा व्यक्त केली. कारण लोक वर्षानुवर्षे प्रेम करतात; पण व्यक्त करत नाहीत. त्यात काय सांगायचं? प्रेम काय शब्दातूनच व्यक्त करावं लागतं? ते तर असतंच असतं. समजावून घ्यावं बस्स! असा सर्वसाधारण नियम पूर्वी होता. आज परिस्थिती बदलली आणि प्रेमाला व्यक्त होण्याची गरज भासू लागली. एका संताच्या दयेनं ठरावीक दिवस म्हणजेच १४ फेब्रुवारी मुक्रर झाला आणि सर्वानुमते गेल्या काही वर्षांपासून हा दिवस साजरा होऊ लागला. अर्थात, जो तो आपापल्या पद्धतीनं अर्थ काढू लागला. क्रमवारीनं त्यात काही चांगल्या तर काही वाईट गोष्टींची भर पडली.

दुर्गाबाईंच्या 'पूर्वा' पुस्तकाचा संदर्भ मनातून जात नाही. 'पूर्वा'तील एक एक कथा, एका एका प्रेममयी वेदनेचं उत्तम उदाहरण आहे. वात्सल्य, प्रेम, प्रणय या भावनात्रयीत एक अस्पष्ट तरल रेषा आहे. इतकी तरल की, या तरल रेषेच्या प्रवासातील टप्प्याटप्प्यावर या कथा आपल्याला नेतात. दुर्गाबाईंचं निसर्गावरील प्रेम, त्यावर मानवी भावभावनांचं रोपण आपल्याला अगदी निसर्गाच्या समीप नेतं. मग, पुन्हा तुकोबाराय आठवतात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' म्हणत! आपल्याकडील सारीच थोर मंडळी विश्वावर प्रेम करणारी आहेत. तीच शिकवण त्यांनी आपल्या वागण्या-बोलण्यातून, साहित्यातून जनमानसात पोहोचवली आहे. 'मी-तू'पणाचं गळलं बंधन! 'अवघे विश्वची माझे घर' असं असताना या प्रेमाच्या अभिव्यक्तीसाठी खरंच का व्हॅलेटांईन डेचं प्रयोजन लागतं? उत्तर अपेक्षित नाही! कारण, प्रश्नाला प्रतिप्रश्न उठणारच.

आपण आज विराट प्रेमावर आपण बोलू. जरा वेगळं, काहीसं हळवं होऊ. कारण, आज मनात दुर्गाबाईंचा विचार पिंगा घालतोय. त्यांच्यासोबत कुसुमाग्रज पण येऊ लागलेत. त्यांच्या कवितेतून अंतरिक्षातील प्रेमाची प्रचिती येते. त्यांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत सूर्य आणि धरेच्या अद्भुत प्रेमकथेचा मिलाफ आहे. अतिशय उत्कट आणि पराकोटीचा समजूतदारपणा याचं हृदयगम्य चित्रण आहे. भास्कराचं प्रेम पृथ्वीवर आहे की नाही, याविषयी संदिग्धता आहे. ती धूसर आहे; पण पृथ्वीचं मात्र त्याच्यावर अतोनात आणि मनस्वी प्रेम आहे. ती त्याच्या कक्षेत युगानुयुगे फिरतेय, याचना करतेय, विनवणी करतेय, आपल्यासाठी किती ग्रह-तारे उत्सुक आहेत, ते भास्कराला सांगतेय; पण ती लाचार नाही, ती चिरविरहिणी आहे. ती त्याला म्हणते, 'अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन् मला ज्ञात मी एक धूलिकण, परी अलंकारिण्या पाय तुझे , धुळीचेच आहे मला भूषण.' जे आपल्याजवळ आहे ते सच्चे आहे, पवित्र आहे, मनापासूनचे आहे, तेच मी तुला देईन ते तू मनापासून स्वीकार. हृदयाच्या गाभ्यापासून ही माझी इच्छा आहे, आर्जव आहे. मनाची असोशी आहे, तहान आहे; पण लाचारी नाही. तुझी दया नको, भीक नको तर प्रेम हवंय. प्रीती हवीय. नाही मिळाली, तर मी तशीच राहीन. तुझी दूरता परवडेल; पण दुबळ्यांचा श्रृंगार नको! ती त्याला रोज पाहते. दुरूनच का होईना निरखत असते. कारण, ती त्याच्याच कक्षेत फिरते ना? किती उच्च कोटीची ही प्रीत, प्रेम! कोणत्या व्हॅलेटांईन डेला सूर्य तिची ही प्रेमभावना ओळखून तिला 'हॅपी व्हॅलेंटाईन डे' म्हणेल आणि प्रपोज करेल? नाही म्हणणार! कदाचित म्हणेल. सारंच काही संदिग्ध!

काही भावना या कालातीत आहेत. काळ गूढ आहे. अदृश्य आहे; पण पारदर्शी आहे. काळाच्या वाहत्या धारेत काही नवीन बदल होऊ लागले आहेत. त्यातील आनंद आपणही घ्यावा आणि इतरांना द्यावा.

# उन्हाळी भुईमूगाच्या जास्त उत्पादनासाठी 'या' काळात लागवड करा, जाणून घ्या सविस्तर

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामाच्या तुलनेत उन्हाळी भुईमुगाचे उत्पादन जास्त मिळते. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी भुईमूगाची पेरणी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या ते तिसऱ्या आठवड्यात करणे गरजेचे असते. उशिरा पेरणी केल्याने काढणीच्या वेळी पाऊस असल्यास काढणीस उशीर होतो व दाण्यांना जमिनीत कोंब फुटून मोठे नुकसान होते.

**उन्हाळी भुईमुगाची लागवड**

टीएजी-२४, टीजी-२६, टीपीजी-४१, आयसीजीएस-११, जेएल-५०१/७७६, बी-९५ (कोयना), फुले उन्नती, फुले चैतन्य, फुले भारती या जातींची उन्हाळी लागवडीसाठी शिफारस केलेली आहे.

जातीनुसार व बियाणाच्या आकारानुसार प्रति हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.

टोकण पद्धतीने ३० १० सेंटीमीटर अंतरावर लागवड केल्यास २५ ते ३० टक्के बियाणे कमी लागते.

प्रति किलो बियाणास ५ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम कार्बेडेन्झिमची बीज प्रक्रिया करावी.




लागवडीपूर्वी १५ ते २० गाड्या चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळून द्यावे.




प्रति हेक्टरी १०० किलो डीएपी किंवा १०० किलो २०:२०:० + १२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट किंवा ४० किलो युरिया + २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट खत जमिनीत पेरून द्यावे.

जस्त लोह व बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता निर्दशनास आली असेल तर- जस्ताच्या कमतरतेसाठी हेक्टरी १० किलो झिंक सल्फेट व बोरॉनच्या कमतरतेसाठी हेक्टरी ५ किलो बोरॅक्स जमिनीत मिसळावे.

**पिकावर अन्नद्रव्यांची कमतरता आढळून आली तर-**

०.५ टक्के (१० लि. पाण्यात ५० ग्रॅम) झिंक सल्फेट किंवा अमोनियम सल्फेट पिकावर फवारावे.

पेरणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी हेक्टरी ५०० किलो जिप्सम झाडाजवळ जमिनीत मिसळून द्यावे.

उपलब्धतेनुसार ८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकास पाणी द्यावे.

- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवा निवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ

# व्हॅलेंटाईन डे' पाश्चात्त्य कुप्रथा!

१४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन डे' साजरा करण्याची पाश्चात्त्य कुप्रथा आपल्या देशातही मोठ्या प्रमाणावर प्रचलित झाली आहे. ज्या व्हॅलेंटाईनला ख्रिस्त्यांचे धर्मगुरु पोप यांनीच 'या नावाचा कोणताही संत नाही' असे म्हणून रोमन दिनदर्शिकेतून पूर्वीच काढून टाकले, त्याच्या नावाने भारतात 'प्रेम दिवस' साजरा करणे हे दुर्दैवी आहे.

व्हॅलेंटाईन डे संपूर्ण जगात विशेषतः अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्ये साजरा केला जातो आणि हल्ली भारतातही इतर सणांप्रमाणे तो मोठ्या प्रमाणावर साजरा होऊ लागला आहे. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी अनेक अनुचित प्रकार घडतात, जसे की तरुणींवरील अत्याचार, मद्यपान, आणि अन्य अनैतिक वर्तन. एका अहवालानुसार, या दिवशी गर्भनिरोधके आणि निरोध यांच्या विक्रीत १० पट वाढ होते. भारतामध्ये ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत रोज डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि व्हॅलेंटाईन डे असे आठ दिवस साजरे केले जातात. हे दिवस परदेशातही इतक्या मोठ्या प्रमाणावर साजरे केले जात नाहीत. यावरूनच भारतातील सामाजिक अधःपतन किती झाले आहे, हे दिसून येते.

**फुले देऊन खरी प्रेमभावना व्यक्त होत नाही :** पाश्चात्त्य देशांमध्ये स्त्रियांना आणि मुलींना फुलांचे गुच्छ विशेष आवडतात. त्यांना वाटते की, जो कोणी त्यांना फूल देतो तो खरोखरच त्यांच्यावर प्रेम करतो. भारतातही याच अनुकरणाने तरुण तरुणींना गुलाबाची फुले किंवा फुलांचे गुच्छ देतात. परंतु हिंदू धर्मात प्रेम व्यक्त करण्यासाठी कधीही गुलाबाचे फूल किंवा फुलांचे गुच्छ दिले जात नाहीत. फुले हे देवतांना अर्पण करण्यासाठी असतात, दारावर तोरणासाठी वापरली जातात, सात्त्विकता वाढवण्यासाठी गजरा म्हणून मस्तकावर माळली जातात, अशा विविध प्रकारे त्यांचा उपयोग होतो.

**व्हॅलेंटाईन डे अनैतिकतेच्या उच्चतम टप्प्यावर !** बहुसंख्य तरुण-तरुणी कामवासना पूर्ण करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा करतात. एका सर्वेक्षणानुसार, सुमारे ३० टक्क्यांहून अधिक तरुण-तरुणी या दिवशी लैंगिक संबंध ठेवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. गर्भनिरोधक उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या मते, इतर




दिवसांच्या तुलनेत या दिवशी गर्भनिरोधकांची विक्री मोठ्या प्रमाणावर वाढते. याचा अर्थ असा की, अविवाहित तरुण-तरुणी या दिवशी अनैतिक संबंध ठेवतात, आणि परिणामी अविवाहित तरुणींना गर्भपात करावा लागतो. या प्रकारामुळे समाजाचे नैतिक स्वास्थ्य बिघडते. हिंदू धर्मात विवाहापूर्वीचे शारीरिक संबंध निषिद्ध मानले गेले आहेत.

समाज व्यवस्थेचा ऱ्हास करणारा व्हॅलेंटाईन डे: 'इंटरनॅशनल बिझनेस टाइम्स' या दैनिकानुसार, व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी आत्महत्येसंबंधी हेल्पलाइनवर सर्वाधिक फोन येतात. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी अपेक्षित प्रेम न मिळाल्यामुळे निर्माण होणारे नैराश्य आणि एकाकीपण हे त्याचे प्रमुख कारण असते. या दिवशी अनेक तरुण-तरुणी मानसिक तणावामुळे नैराश्यात जातात. अशा परिस्थितीत समाजव्यवस्था उद्ध्वस्त करणारा आणि अनेक व्यक्तींना नैराश्यात ढकलणारा हा दिवस आपण साजरा का करतो?

**पाकिस्तानमध्येही व्हॅलेंटाईन डे वर बंदी:** पाकिस्तानच्या एका उच्च न्यायालयाने १४ फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यास बंदी घातली होती. न्यायालयाच्या मते, सोशल मीडियावर व्हॅलेंटाईन डेचा प्रचार करणे हे इस्लामच्या विरोधात आहे. न्यायालयाने सर्व प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाला अशा कोणत्याही प्रचारास प्रतिबंध घालण्याचे आदेश दिले होते. (स्रोत : नवभारत टाइम्स) पाकिस्तानचे तत्कालीन राष्ट्रपती ममनून हुसैन यांनीही व्हॅलेंटाईन डे हा मुस्लिम परंपराविरोधात आहे असे सांगत तो न साजरा करण्याचे आवाहन केले होते.

देशासाठी यौवन अर्पण करणाऱ्या क्रांतिकारकांना विसरू नका! आपल्या संस्कृतीनुसार, व्यक्तीपेक्षा कुटुंब, कुटुंबापेक्षा समाज आणि समाजापेक्षा देश अधिक महत्त्वाचा आहे. या दृष्टिकोनातूनच भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांसारख्या वीरांनी आपले यौवन देशासाठी अर्पण केले, ज्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. जर त्यांनी व्हॅलेंटाईन डेच्या तथाकथित प्रेमभावनेला महत्त्व दिले असते आणि विवाह करून आपले जीवन व्यतीत केले असते, तर आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असते का? याचा विचार करायला हवा.

**हिंदू धर्माने शिकवलेले उच्च मूल्य !** व्हॅलेंटाईन डे आणि अशा प्रकारचे दिवस पाश्चात्त्यांनी निर्माण केलेल्या कुप्रथा आहेत. या दिवसांमध्ये मिळणाऱ्या तथाकथित आनंदाच्या पलीकडे, हिंदू धर्माने शिकवलेले सत्य, चिरंतन आनंद आणि मोक्ष यासारखे महान तत्त्वज्ञान आहे. जर आपण हिंदू धर्माचा अभ्यास करून त्याचे आचरण केले, तर जीवन तणावमुक्त होऊन जीवनात आनंद अनुभवता येतो.त्यामुळे व्हॅलेंटाईन डे साजरा करण्याऐवजी, हिंदू धर्माचे योग्य शिक्षण घ्या, धर्माचरण करा आणि इतरांनाही त्यासाठी प्रेरित करा. लक्षात असू द्या 'धर्मो रक्षति रक्षितः' अर्थात , 'धर्माचे रक्षण करणाऱ्याचे धर्म रक्षण करतो'.




## थायरॉईड आणि मुलांमधील चुकीच्या आहार सवयी

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक** - मुलांच्या आहाराच्या सवयी या त्यांचे थायरॉईडचे आरोग्य चांगले राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. चुकीच्या आहाराच्या सवयींमुळे पौष्टिकतेची कमतरता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे त्यांच्या थायरॉईडच्या कार्यावर परिणाम होतो.आपल्या घशात फुलपाखराच्या आकाराची एक ग्रंथी असते, ज्याला थायरॉईड म्हणतात. जेव्हा आपल्या घशात थायरॉक्सिन आणि ट्रायओडोथायरोनिन हे महत्त्वाचे संप्रेरक योग्यरीत्या तयार होत नाहीत, तेव्हा थायरॉईड रोग होतो. थायरॉईड ग्रंथी या वाढ, चयापचय, ऊर्जा पातळी आणि एकूण विकास नियंत्रित करणे यासारख्या विविध शारीरिक कार्यास जबाबदार आहे. ती शरीरातील प्रत्येक अवयवावर लक्षणीय परिणाम करणारे हार्मोन्स तयार करते. हार्मोन्समध्ये अचानक असंतुलन झाल्यास थायरॉईडची स्थिती निर्माण होते.

थायरॉईडची दोन प्रकारची स्थिती असते. हायपोथायरॉईडीझम (अंडरॲक्टिव्ह थायरॉईड) आणि हायपरथायरॉईडीझम (अतिसक्रिय थायरॉईड). याची विविध लक्षणे थायरॉईड असंतुलन दर्शवू शकतात. यामध्ये अचानक वजन वाढणे किंवा वजन कमी होणे, खूप गरम होणे किंवा खूप थंडी वाजणे, भूक न लागणे, थकवा येणे, हृदयाची गती वाढणे, बद्धकोष्ठता आणि केस पातळ होणे यासारख्या लक्षणांचा यात समावेश असतो.

मुलांमधील आहार आणि थायरॉईड आयोडीनची कमतरता

थायरॉईड संप्रेरकांच्या निर्मितीसाठी आयोडीन आवश्यक घटक आहे. आयोडीनच्या कमतरतेमुळे थायरॉईडची निष्क्रियता यासह विविध आरोग्य समस्या उद्भवतात. त्यामुळे थकवा, वजन वाढणे आणि मंद गतीने वाढ होणे अशी लक्षणे उद्भवतात. थायरॉईड संप्रेरकाची पातळी योग्य राखण्यासाठी मुलाला त्यांच्या आहारातून पुरेसे आयोडीन मिळेल याची दक्षता घ्यावी.

**पोषक घटकांची कमतरता-** लहान मुले



पूरक अन्नपदार्थांचे सेवन करत नसतील, तर त्यांना पोषक तत्त्वांच्या कमतरतेचा सामना करावा लागण्याची शक्यता असते. सेलेनियम, झिंक किंवा लोह यासारख्या आवश्यक पोषक तत्त्वांच्या कमतरतेमुळे थायरॉईड ग्रंथीची हार्मोन्स तयार करण्याची आणि नियंत्रित करण्याची क्षमता कमकुवत होते. यामुळे मूड स्विंग्ज होणे, एका विशिष्ट गोष्टीवर लक्ष केंद्रित करता न येणे किंवा विकासात्मक अडथळे येतात.

**प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ-** मुलांमध्ये आहाराच्या चुकीच्या सवयीमध्ये प्रक्रिया केलेले किंवा पॅकेज फूडचे अधिक सेवन असते. यामध्ये चरबी, सोडियम आणि प्रिझर्व्हेटिव्हजचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे सहजपणे जळजळ होते. यामुळे थायरॉईड ग्रंथीच्या कार्यावर नकारात्मक परिणाम होतो. एखादी दीर्घकालीन सूज हीदेखील हार्मोन उत्पादनात व्यत्यय आणू शकते. त्यामुळे मूल थकलेले आणि चिडचिडे होऊ शकते. यासाठी त्यांना चुकीचा आहार किंवा प्रक्रिया केलेले

# राष्ट्रवादीचे माजी आमदार तुकाराम बिडकर यांचे अपघाती निधन

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन परतत असताना दुचाकीला धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अकोला-** राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार तथा विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष तुकाराम बिडकर यांचे निधन झाल्याची माहिती आहे.

अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. ते गुरुवारी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन परतत होते. तेव्हा शिवर येथे त्यांच्या गाडीला भीषण अपघात झाला ज्यात त्यांचा मृत्यू झाला आहे.

एका पिकअप गाडीने तुकाराम बिडकर यांच्या दुचाकीला धडक दिल्याने तुकाराम बिडकर आणि त्यांच्यासोबत असलेले त्यांचे मित्र राजदत्त मानकर या दोघांना मोठी दुखापत झाली आणि



त्यातच त्यांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्या मित्राबाबत अद्याप कुठलीही माहिती नाही.

अकोलामधील शिवणी शिवर गावाजवळील पेट्रोल पंपासमोर एका मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

अकोला विमानतळावर भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री बावनकुळे यांना विमानतळवर भेटले होते. बावनकुळे यांना भेटून बिडकर दुचाकीने घरी येत होते.

बिडकर यांची दुचाकी शिवर गावाजवळ आली असताना त्यांच्या दुचाकीला मालवाहू टेम्पोने धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.तुकाराम बिरकड यांनी २००४ ते २००९ या काळात आमदार होते. मुर्तीजापूर मतदारसंघाचे ते आमदार होते. काँग्रेस राष्ट्रवादी सरकारच्या काळात होते विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष होते. विदर्भातील राष्ट्रवादी काँग्रेसचा माळी समाजातील मोठा चेहरा होते. आमदार होण्याआधी तुकाराम बिडकर अकोला जिल्हा परिषदेत सभापती होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण


# महापालिकेने रोखले २००संशयित जन्म दाखले

## सरकारी आदेशानंतर कागदपत्रांची सखोल तपासणी सुरू

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४अमरावती–** बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशी आणि रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्रे दिली जात असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर, राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या सूचनेनुसार, संशयास्पद कागदपत्रे आढळल्यास जन्म प्रमाणपत्रे देण्यावर बंदी घालण्यात आली आहे. याअंतर्गत, अमरावती महानगरपालिकेने सुमारे २०० संशयित जन्म प्रमाणपत्र रोखले आहेत.

जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी येथे १४८४ बांगलादेशींना बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र दिल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. त्यांनी अमरावती आणि अंजनगावला भेट दिली आणि प्रशासनावर जिल्ह्यातीलविविध तहसीलमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे बांगलादेशींना जन्म प्रमाणपत्रे दिल्याचा आरोप केला. नंतर, राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार, एक एसआयटी स्थापन करून तपास सुरू करण्यात आला.

दरम्यान, २१ जानेवारीला राज्यसरकारने सर्व जिल्ह्यांना आदेश पाठवले आणि संशयितांना



जन्म प्रमाणपत्र देणे थांबवून प्रकरणाची चौकशी सुरू करण्यास सांगितले. अलिकडेच अंजनगाव सुर्जीमध्ये ६ संशयितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आता अमरावती महानगरपालिकेचा जन्म आणि मृत्यु विभाग देखील जन्म प्रमाणपत्र देताना कागदपत्रांची कसून तपासणी करत आहे. पूर्वी तहसील कार्यालयातील शपथपत्र, आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड इत्यादी तपासल्यानंतर जन्म प्रमाणपत्रे दिली जात होती. परंतु राज्य सरकारच्या आदेशानंतर आता जन्म दाखल्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) अनिवार्य करण्यात आला आहे. याशिवाय, सरकारी रुग्णालयात किंवा खाजगी रुग्णालयात जन्मलेल्या मुलाच्या प्रमाणपत्रासाठी, रुग्णालयातील डिस्चार्ज कार्ड आणि पालकांचे आधारकार्ड अनिवार्य करण्यात आले आहे.ज्या नागरिकांना स्वतःचा जन्म दाखला आवश्यक आहे. त्यांच्या अर्जानंतर, आता महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागात नोंदीची तपासणी केली जात आहे. जर संबंधित व्यक्तीचे नाव रजिस्टरमध्ये नोंदवलेले नसेल आणि महानगरपालिकेने त्याला जन्म प्रमाणपत्र दिलेले नसेल किंवा जर संबंधित व्यक्तीकडे कोणतेही कागदपत्रे नसतील, किंवा त्यांची कागदपत्रे संशयास्पद आढळली तर त्यांचे जन्म प्रमाणपत्र देणे थांबवण्यात आले आहे. गेल्या एका महिन्यात महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागाने अशा २०० लोकांना जन्म प्रमाणपत्र देणे थांबवले आहे. कागदपत्रांमधील शंकांमुळे हे पाऊल उचलण्यात आले आहे. जन्म-मृत्यू विभागाच्या अधीक्षक प्रतिभा आत्राम यांनी अमरावती विभागाला ही माहिती दिली.

## इंजिनिअरिंगमध्ये नापास झालात, नो टेन्शन विद्यार्थ्यांना मिळणार पुढच्या वर्गात प्रवेश!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर :–** इंजिनिअरिंग शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे पुढील वर्गात जाण्यास अडचण येते, त्यांच्यासाठी आता एक मोठा दिलासा मिळाला आहे. दहावीच्या परीक्षेमध्ये जसा एटिकेटीचा पर्याय उपलब्ध करून दिला जातो, तसाच प्रकार आता अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे अभियांत्रिकीच्या परीक्षेत अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना आता पुढील वर्गात प्रवेश घेता येणार आहे.

दहावीच्या वर्गात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना ऐटीकेटीच्या माध्यमातून अकरावीला प्रवेश मिळतो. याच धर्तीवर आता अभियांत्रिकीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना देखील नापास झाल्यानंतरही पुढच्या वर्गात प्रवेश मिळणार आहे. त्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आदेश सोमवारी काढला आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेताना जर एखाद्या विद्यार्थ्याचा पहिल्या वर्षाचे विषय राहिले तर त्याला तृतीय वर्षाला प्रवेश मिळत नाही.

# विदर्भातील पहिले रेशीम कोष विक्री केंद्र बंद

## कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक व्यर्थ, शेतकऱ्यांपर्यंत योजना पोहोचलीच नाही

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४बडनेरा –** येथील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे, या उद्देशाने रेशीम प्रादेशिक संचालनाच्या अधिपत्याखालील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात सुरू करण्यात आलेले रेशीम कोष खरेदी केंद्र बंद पडले आहे. सरकारी धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतकऱ्यांपर्यंत ही योजना पोहोचलीच नसल्याने कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक वजा खर्च व्यर्थ गेला आहे.

बडनेरा येथे विदर्भातील पहिल्या रेशीम कोष खरेदी केंद्राचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले होते. परंतु या लिलाव केंद्राला शेतकऱ्यांकडून कुठल्याच प्रकारचा प्रतिसाद न मिळत नसल्यामुळे गेल्या चार महिन्यापासून रेशीम कोष लिलाव केंद्र बंद पडले आहे. हे केंद्र सुरू करण्याकरिता रेशीम संचालनालय कुठल्याच प्रकारचा प्रयत्न करीत नाही. बडनेरा येथील कृषी उत्पन्न



बाजार समितीच्या परिसरात केंद्र सुव्यवस्थित सुरू राहण्याकरिता, प्राथमिक स्तरावर रेशीम संचालनालयाने रेशीम कोष खरेदी करण्याकरिता येणाऱ्या व्यापाऱ्यांची व खरीदाराची सोय व्हावी या दृष्टीकोनातून परिसरामध्ये त्यांच्या राहण्याची व व्यवस्था केली, परंतु शेतकऱ्यांचा योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे कोटी रुपयाच्या योजनेचा फज्जा उडाल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांना या प्रकरणात कुठल्याच प्रकारचे सारस्व नसल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात अमरावती व भातकुली या तालुक्यात तूर्तास १५० हून अधिक शेतकरी रेशीम शेती करतात परंतु ही बाजारपेठ सुरक्षित राहावी याकरिता कृषी उत्पन्न बाजार समिती व रेशीम प्रादेशिक कार्यालय कुठल्याच प्रकारचा प्रयत्न करीत नसल्याचा आरोप स्थानिक शेतकऱ्यांचा आहे. या केंद्रात पश्चिम बंगाल, कर्नाटक, गुजरात, तसेच इतर राज्यातून व्यापारी वर्ग रेशीम कोष खरेदी करण्यासाठी येत होता. परंतु शेतकऱ्यांची उदासीनता आणि प्रशासनाचे प्रयत्न अपुरे पडल्यामुळे रेशीम कोष खरेदी विक्री लिलाव केंद्र बंद पडले आहे.









## राणा दाम्पत्यांचे त्रिवेणी संगमाममध्ये अमृत स्नान...

प्रयागराज येथे सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात माजीखा. नवनीतराणा, आ. रवीराणा गुरुवारला पोहोचले. यावेळी भाविकांसोबत त्यांनी त्रिवेणी संगमाममध्ये अमृत स्नान करून पवित्र गंगेला त्रिवार वंदन करीत सर्वाच्या उज्वल भविष्याची प्रार्थना केली. तत्पूर्वी त्यांनी पं. प्रदीप मिश्रा यांची शिवकथा ऐकूण आशीर्वाद घेतले.

## विद्यापीठातील पर्यायी परीक्षेचे वेळापत्रकात जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती** –संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित पाचहीजिल्हांच्या महाविद्यालयां मधील क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष इत्यादी स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या व विद्यापीठाच्या संबंधित अधिका–यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठीय पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत असून वेळापत्रका नुसार १ मार्च, २०२५ पासून पुढे दिलेल्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार आहे. अमरावती जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा विद्याभारती महाविद्यालय, अमरावती (१२६), अकोला जिल्हातील विद्यार्थ्यांची श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलडाणा जिल्हातील जी.एस. महाविद्यालय, खामगांव (३०१), यवतमाळ जिल्हातील अमोलकचंद महा विद्यालय, यवतमाळ (४०१), वाशिम जिल्हातील आर.ए. महाविद्यालय, वाशिम (७०१) तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमां करीता विद्यार्थ्यांच्या हिवाळी–२०२४ परीक्षेच्या प्रवेश पत्रावर नमूद केलेले परीक्षा केंद्र राहतील. सदर विद्यार्थ्यांचे हिवाळी–२०२४ परीक्षेकरीता देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेश पत्र पर्यायी परीक्षेकरीता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रनिहाय रोललिस्ट विद्यापीठा च्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. 'संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी.

## मनपातील तोतया कर्मचाऱ्यास अटक

### कोतवाली पोलिसांची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४अमरावती–**

महापालिकेत कर्मचारी म्हणून कामे करणाऱ्या तोतया कर्मचाऱ्यास पोलीसांनी गुरुवारी (ता. १३) दुपारी अटक केली. ओम पांडुरंग पाटील (२९, छांगाणी नगर) असे अटक करण्यात आलेल्या तोतया कर्मचाऱ्याचे नाव आहे. महापालिकेतील अधिकाऱ्याच्या सूचनेवरून शहर कोतवाली पोलीसांनी ही कारवाई केली. ओम पाटील हा बांधकाम विभागात काम करीत होता.ओम पाटील हा महापालिकेच्या बांधकाम विभागात लिपीक म्हणून काम करीत होता. त्याच्याकडे महापालिकेचे ओळखपत्र देखील होते. त्याच्या ओळख पत्रावरील आयडी क्रमांक मनपाच्या झोन क्रमांक ५ मध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचा आहे.त्याच्याओळखपत्रावर मनपाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याची सही व शिक्का देखील आहे. तो दीड वर्षापासून महापालिका प्रशासकीय परिसरात वावरत होता. यामुळे काही कर्मचारी व अधिकाऱ्याना त्याच्यावर संशय आला. त्यांनी या प्रकाराची माहीती शहर कोतवाली पोलीसांना दिली.यानंतर पोलीसांनी ओम पाटील याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान, ओम पाटील याला ओळखपत्र बनवून देणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्याची देखील पोलीसांनी विचारपूस केली. ओम पाटील याने सॅलरी स्लीप दाखविल्याने त्यास ओळखपत्र दिल्याचे



### तत्काळ अहवाल मागणार


हा धक्कादायक प्रकार आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या मोठी असली तरी ज्या विभागात तो काम करीत होता, तेथील प्रमुख अधिकाऱ्यांच्या लक्षातन येणे ही मोठी बाब आहे. त्यामुळे मनपाच्या विभागातील आता सर्वच सर्व एचओडींना याबाबत अहवाल मागून आस्थापनावरील किती, कंत्राटी किती, याबाबत मागून तपासणी करण्यात येणार आहे. सोबत जो कंत्राटी कर्मचारी ज्या संस्थेचा आहे, त्याला त्याच संस्थेचे ओळखपत्र अनिवार्य करण्यात येणार आहे.– सचिन कलंत्रे (मनपा आयुक्त)

सांगण्यात आले. ओम पाटील याच्या अटकेमुळे महापालिका प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## मराठी पेपर ला ही कॉपी

### तिवसा तालुक्यातील प्रकार

**विर्भ प्रजासत्ताकदि.१४अमरावती :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येत असलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला ११ फेब्रुवारीला प्रारंभ झाला आहे. या परीक्षेच्या तिसऱ्या दिवशी मराठी विषयाच्या पेपरला एका परीक्षा केंद्रावर कॉपी प्रकरणाची नोंद करण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाच्या सूत्रांनी दिली.इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेच्या गुरुवार १३ फेब्रुवारी या परीक्षेच्या



तिसऱ्या दिवशी मराठी विषयाच्या पेपरला तिवसा तालुक्यातील परीक्षा केंद्रांवर कॉपी केल्याचे एक प्रकरण उघडकीस आले आहेत. याप्रकरणी भरारी पथकाने नोंद घेत संबंधितांवर कारवाईचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकारकडून यंदा बाराती बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त परीक्षा राबविण्यासाठीचे अभियान जोमाने चालवले जात आहे. असे असताना इयत्ता बारावीच्या परीक्षेत परीक्षेला प्रारंभ झाल्यापासून आतापर्यंत तीन पेपरपैकी इंग्रजी विषयाच्या पेपरच्या दिवशी दोन आणि मराठी विषयाच्या पेपरच्या दिवशी एक अशा तीन कॉपी प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. या कॉपी प्रकरणी प्राथमिक स्तरावर चौकशी सुरु असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा कॉपीमुक्त अभियानाच्या माध्यमातून परीक्षेपूर्वी जिल्हाभरातील शाळा–महाविद्यालयांमध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना शपथ देऊन गैरमार्गाचा वापर न करता निःसंकोचपणेपेपर सोडविण्याचे आवाहन केले आहे.


# युपीएससी परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण वाढण्यासाठी गुणात्मक उपाययोजना सुचवा

### – सुधारणा समितीचे अध्यक्ष जे. पी. डांगे

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१४अमरावती,–** केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण वाढावे, यासाठी संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक आदींनी स्वयंस्फुर्तीने पुढाकार घेऊन सदर परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच राज्य शासनाव्दारे चालविण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांना गुणात्मक उपाययोजना सुचवाव्यात, असे आवाहन माजी मुख्य सचिव तथा सुधारणा समितीचे अध्यक्ष जे. पी. डांगे यांनी आज केले.

राज्यातील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये सुधारणा करण्यासाठी येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त श्र्वेता सिंघल, अमरावती प्री आएएस ट्रेनिंग सेंटरच्या संचालिका डॉ. संगिता यावले, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे तसेच विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक आदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. श्री. डांगे म्हणाले की, राज्यात राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद व कोल्हापूर असे सहा भारतीय प्रशासकीय



सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित आहेत. राज्यातील विद्यार्थ्यांना या केंद्राच्या माध्यमातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. या केंद्रात विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेऊन मेरीटनुसार प्रवेश दिला जातो. या केंद्रात युपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निवास, भोजन, विद्यावेतन यासह परीक्षेच्या अभ्यासक्रमाशी निगडीत पुस्तके, ग्रंथालय, इंटरनेट सेवा आदी सुविधा पुरविण्यात येते. यासंदर्भात ग्रामीण व शहरी भागातील होतकरु विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्यात यावी.

भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये गुणात्मक उपाययोजना करण्यासाठी राज्यस्तरीय सुधारणा समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून अध्यापन, शिक्षण व मुल्यांकन पध्दती, भौतिक सुविधा संसाधने व तांत्रिक सुविधा, ग्रंथालय सुविधा, प्रशिक्षणाचा कालावधी, ताणतणाव व्यवस्थापन, विद्यावेतन, मार्गदर्शकांना देण्यात येणारे मानधन, सर्व केंद्रामध्ये डिजीटल कनेक्टीविटी, निवासी वसतीगृह व तेथील सुविधा, संगणक प्रयोगशाळा सुविधा, प्रवेश प्रक्रिया व वसतीगृह प्रवेश नियमावली, नवी दिल्ली येथे मुलाखतीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत पूर्व प्रशिक्षण आदी संदर्भात गुणात्मक उपाययोजना सुचविण्यात येणार आहे, अशी माहिती विभागीय आयुक्तांनी दिली. विभागातील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा उत्तीर्ण अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील युपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत विशेष उपक्रम राबवून मार्गदर्शन करावे, असे आवाहन श्रीमती सिंघल यांनी यावेळी केले.

# आजपासून १८ फेब्रुवारी पर्यंत नभांगणी शुक्राचे विलोभनीय दर्शन

## राहणार प्रचंड तेजस्विता

**१३० वर्षात दोनदा सूर्य बिंबावरून अधिक्रमित**

शुक्र अंतर्ग्रह असल्यामुळे १३० वर्षात दोनदा सूर्य बिंबावरून अधिक्रमित होत असतो. या अगोदर २००४ आणि २०१२ यावर्षी शुक्र अधिक्रमण अनेक लोकांच्या स्मरणात असेल. यानंतर अशी स्थिती ९२ वर्षानंतर २११७ यावर्षी येईल, अशी माहिती प्रभाकर दोड यांनी दिली.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अकोला : –** सूर्यमालेतील सर्वात तेजस्वी ग्रह म्हणून शुक्राची ओळख आहे. सध्या पश्चिम आकाशात अधिराज्य गाजवणारा शुक्र ग्रह कधी तारा म्हणून ओळखल्या जात होता. सद्यस्थितीत पृथ्वीच्या जवळ आल्याने त्याची तेजस्विता अधिकाधिक वाढलेली आहे. १४ ते १८ फेब्रुवारीदरम्यान सर्वाधिक तेजस्विता असल्याने शुक्र ग्रह पश्चिम आकाशात अधिक प्रकाशमान दिसणार आहे, अशी माहिती खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी दिली.




शुक्र हा ग्रह पृथ्वी खालोखाल आकाराचा, सूर्यापासून क्रमांक दोनवर आहे. पृथ्वी व सूर्य यांच्यात असल्याने या ग्रहाचा उदय व अस्त पूर्व किंवा पश्चिम क्षितिजावर होतो. याला सायंकालीन किंवा प्रभात कालीन तारा समजून प्राचीन काळी याच्या आकाश स्थितीवरून वेळ सुद्धा ठरवली जात होती. या ग्रहावर ढगांचे आवरण अधिक प्रमाणात असून त्याला बुरख्यातील सुंदरी म्हणून ओळखले जात होते. सुमारे ६५ टक्के सूर्यप्रकाश परावर्तित होत असल्याने हा एकमेव ग्रह दिवसा, भर दुपारी सूर्य असताना आकाशात दिसू शकतो. अंधाऱ्या रात्री शुक्र प्रकाशात सावल्या सुद्धा पाहता येतात.

सध्या शुक्र ग्रह राशी चक्रातील मीन राशीत असून १९ मार्चला पश्चिम क्षितिजावर त्याचा अस्त होईल. २६ मार्चपासून पुन्हा पहाटे पूर्व क्षितिजावर उदय होणार आहे. सध्या या ग्रहाचे दुर्बिणीतून निरीक्षण केल्यास कृष्ण पंचमीच्या चंद्राप्रमाणे त्याच्या कलांचे मनमोहक दर्शन होत आहे. या महिन्याच्या शेवटी तर चतुर्थी शुक्रकोर फारच विरोभनीय दिसेल. २१ मार्च विषुवदिनी या शुक्र ग्रहाची अमावस्याची स्थिती असेल. शुक्र ग्रहाचा दिवस वर्षापेक्षा मोठा असून पृथ्वीच्या तुलनेत शुक्रावरील दिवस हा २४३ दिवसाचा असतो. या ग्रहावर नेहमी आम्ल पाऊस पडत असून हा पाऊस जमिनीवर वाहत न जाता उष्णतेने पुन्हा बाष्पीभवन होऊन खाली वर होत राहतो, असे प्रभाकर दोड म्हणाले. हा एक आगळावेगळा ग्रह आपल्याला सध्या अतिशय चांगल्यापैकी दर्शनास सज्ज आहे. या खगोलीय घटनेचा आनंद घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे ओझे हजार कोटींचे!

## अमरावती जिल्हा २५.२२ लाख थकबाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** राज्य शासनाच्या अनेक लोककल्याणकारी योजनांना निधीची चणचण भासत असल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. काही योजना बंद करण्याच्या हालचालीही शासकीय स्तरावर सुरू आहेत. सामान्य रुग्णांसाठी वरदायी ठरलेली महात्मा फुले जनआरोग्य योजनाही निधीटंचाईच्या गर्तेत सापडली आहे.




या योजनेतून उपचार करणाऱ्या राज्यभरातील रुग्णालयांना जुलै २०२४ पासून छदामही मिळालेला नाही. या योजनेत समाविष्ट असलेल्या १ हजार ६६० रुग्णालयांची थकबाकी ८८९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. गेल्या शनिवारपर्यंतची ही स्थिती आहे.

ही बातमी प्रसिद्ध होईपर्यंत थकबाकीचा आकडा हजार कोटींपर्यंत गेलेला असेल. सर्व गटांतील रुग्णांना कॅशलेस उपचार देणारी ही योजना गरजू रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे.

१,३६५ प्रकारच्या आजारांवर या योजनेतून अगदी मोफत उपचार केले जातात. शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार रुग्णालयांना परतावा मिळतो; पण गेल्या जुलै महिन्यापासून रुग्णालयांना पैसे मिळालेले नाहीत.

सामान्यत: दीड ते दोन महिन्यांत पैसे अदा होतात; पण सध्या मात्र सात महिने झाले तरी पैशांची प्रतीक्षा संपलेली नाही. परतावा मिळावा म्हणून रुग्णालये शासनाकडे पाठपुरावा करत आहेत.

परतावा मिळालेला नसला, तरी रुग्णालयांनी रुग्ण दाखल करून घेणे थांबविलेले नाही, ही बाब दिलासादायक ठरली आहे. मात्र, तशी परिस्थिती कधीही निर्माण होण्याची भीती आहे. छोट्या शहरांतील रुग्णालयांची मोठी थकबाकी पेलण्याइतपत क्षमता नसल्याने त्यांचा आर्थिक गाडा कोलमडू पाहत आहे.

**रुग्णांना त्रास**

परतावा मिळाला नसल्याने मेटाकुटीला आलेल्या रुग्णालयांकडून उपचारांचे काही साहित्य व औषधी रुग्णांनाच आणण्यास सांगितले जात आहे. यातून रुग्णांना भुर्दंड सोसावा लागत आहे. शासकीय रुग्णालयात मात्र अशी स्थिती नाही.

| | |
|---|---|
| योजनेतील राज्यभरातील रुग्णालये | – १,६६१ |
| जुलै २०२४ पासून थकबाकी | – ८८९ कोटी |
| सांगली जिल्ह्यातील रुग्णालये | – ६० |
| जुलै २०२४ पासून थकबाकी | – ३६ कोटी |

**अमरावती विभागाची थकबाकी अशी**

| | |
|---|---|
| अमरावती : | २५.२२ |
| अकोला : | १९.३७ |
| बुलडाणा : | १२.८२ |
| वाशिम : | ७.७८ |
| यवतमाळ : | ७.७१ |

# प्रसूतीसाठी आलेल्या महिलेचा बालकासह मृत्यू

## अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात तणाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अचलपूर**

चिखलदरा तालुक्यातील खटकली गावातील १९ वर्षीय महिलेचा प्रसूती दरम्यान नवजात बालकासह दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात घडली. यावरून तणावाची स्थिती निर्माण झाली होती. मृतक गर्भवती महिला ही सिकलसेल आजाराने ग्रस्त होती. तिला चिखलदरा ग्रामीण रुग्णालयातून अचलपूरला पाठविण्यात आले होते.

कमी दिवसाचा गर्भ व सिकलसेलच्या अत्याधिक त्रासाने महिलेचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांचे म्हणणे असून महिलेच्या परिवाराने मात्र डॉक्टरांवर हलगर्जीपणाचा आरोप केला आहे. या मृत्यूने मेळघाटात आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. जयश्री सुरेश भास्कर (वय १९ वर्षे रा . खटकली ता . चिखलदरा) असे या महिलेच नाव आहे. तिला प्रसव कळा येऊ लागल्याने चिखलदरा येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. सिकलसेलची रुग्ण असल्यामुळे उपचार करीत असताना तब्येत खालवल्याने तिला तात्काळ उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे पाठविल्या गेले.

येथे उपस्थित डॉक्टर व कर्मचार्यांनी शर्तीचे प्रयत्न केले, परंतु कमी दिवसाचा गर्भ व सिकलसेलच्या अत्याधिक पीडेमुळे सदर महिलेची प्रसूती होऊन बाळ दगावले. त्यातच उपस्थित डॉक्टरांनी महिलेला ऑक्सीजन व इतर उपचार केले, परंतु मातेचाही उपचारा दरम्यान बुधवारी रात्री १० वाजता मृत्यू झाला. अर्धा तासात घडलेल्या घटनेने महिलेसोबत आलेल्या नातेवाईकांनी डॉक्टरवर उपचारात हलगर्जीपणाचा आरोप लावला होता. घटनेची माहिती मिळताच मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांच्या स्वीय साहायकांनाही उपजिल्हा रुग्णालयात आले होते. दगावलेल्या महिलेचा पती बाहेरगावी कामावर गेला असल्याने तो येईपर्यंत बाळ व मातेचे पोस्टमार्टम करू नये, यावर नातेवाईक अडले होते. परंतु स्वीय सहाय्यकांनी नातेवाईकांची समजुत काढली.

**आरोप खोटा**

याबाबत बोलताना रुग्णालयातल्या डॉ. श्रेयल सोलव म्हणाल्या की, मृत गर्भवती महिला व तिचा पती हे आकोला जिल्ह्यातील चोहट्टा बाजार येथे विटाभट्टीवर काम करत होते. त्यामुळे तिला या दरम्यान योग्य औषध उपचार मिळाला नाही, तसेच तिला सिकलसेल होता. कमी दिवसाचा गर्भ असल्याने बाळ दगावले व अत्याधिक पीडेने माता दगावली. उपचार न झाल्याचा आरोप खोटा आहे.

# आनंदवाडीच्या जंगलात आगीचे तांडव

## अथक प्रयत्नानंतर नियंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४तिवसा–**

शहरातील आनंदवाडी शिवारात वनविभागाच्या जंगलात आग लागून सुमारे २५ हेक्टरवरील जागेतील काही भाग जळून खाक झाल्याची घटना गुरूवाी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली.



ही बाब स्थानिक ग्रामस्थांनी नगर पंचायतचे अग्निशमक व वनविभाग यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी येत ग्रामस्थांना सोबत घेऊन आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. वनपाल सोमेश्वर घोरमाडे व नगर पंचायत अग्निशमक कर्मचारी यांच्या मदतीने ही आग आटोक्यात आणण्यात आली. दरम्यान, आगीचे कारण समजू शकले नाही. मात्र, डोंगर शिवार हा निर्मनुष्य असून तिथे टवाळखोरांनी ही आग लावली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

आग लागल्यानंतर जंगल भाग असल्याने तेथे अग्निशामक बंबाचे वाहन येणे अशक्य होते. त्यामुळे आग विझविण्यासाठी ओल्या झाडा – झुडपांच्या फांद्या हातात घेऊन तब्बल दोन तास शर्थीचे प्रयत्न करत वनविभागाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

**एक हजार झाडांचे नुकसान**

आगीची झळ साग, शिसव, कडूनिंब, जंगली बाभळी आणि इतर सुमारे एक हजारहून अधिक झाडांना बसली. त्यातील बहुतेक झाडे पाच वर्षांहून अधिक वयाची होती. मोठ्या झाडांना थोडीच झळ बसल्याने ती वाचण्याची शक्यता आहे. इतर झाडे मात्र आगीच्या भक्ष्यस्थानी पडून खाक झाली.

# गुवाहाटीला गेलो तेव्हाच उद्धव ठाकरेंचे भविष्य संपले, हम दो हमारे दो राहतील

## शहाजी बापू पाटील यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४मुंबई–** गेल्या अनेक दिवसांपासून राज्यभरातून ठाकरे गटाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हाप्रमुख, माजी नगरसेवक यांच्यासह अनेक जण शिवसेना शिंदे गटात सामील होत आहेत. ठाकरे गटाला लागलेली गळती थांबता थांबत नाही. एकीकडे स्वबळावर महापालिका निवडणुका लढण्याची तयारी उद्धव ठाकरे यांनी केली असली, तर दुसरीकडे मात्र ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस अधिकच वाढत चालल्याचे दिसत आहे. असेच सुरू राहिल्यास आगामी महापालिका निवडणुका या ठाकरे गटासाठी मोठे आव्हान ठरू शकते, असे सांगितले जात आहे. राजन साळवी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. राजन साळवी यांच्या पक्षप्रवेशावरून ठाकरे गटातील नेत्यांनी टीका केली.



या टीकेला शिवसेना शिंदे गट तसेच महायुतीतील नेते पलटवार करत आहेत.

आम्ही गुहाटीला गेलो, त्याच वेळेस उद्धव ठाकरेंचे भविष्य संपले. त्यांना संधी दिली होती, मात्र त्यांनी आपण निष्क्रिय आहोत, हेच महाराष्ट्राला दाखवून दिले. खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांचे विचार घेऊन पुढे जात आहे, हे राजन साळवी यांना समजले म्हणून त्यांनी शिवसेनेत प्रवेश करायचा निर्णय घेतला. येत्या सहा महिन्यात ठाकरे गटामध्ये कोणीच शिल्लक राहणार नाही. टप्प्याटप्प्याने सगळेच खऱ्या शिवसेनेत प्रवेश करतील. उद्धव ठाकरे हे संजय राऊत यांच्या नादाला लागल्यामुळे भविष्यात ते एकाकी पडतील, असा दावा शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटील यांनी केला.

# एसटी भाडेवाढीनंतर उत्पन्नात १३ टक्के वाढ; पंधरवड्यात ५१ कोटींचे उत्पन्न

**विदर्भ पराजसत्ताक**

**दि.१४मुंबई –** राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या उत्पनामध्ये १३ टक्क्यांची वाढ झाली असून भाडेवाढी पूर्वीच्या आणि नंतरच्या १० दिवसांची सरासरी केली असता उत्पनामध्ये १३ टक्के म्हणजे ५१.७१ कोटी रुपयांनी वाढले आहे. दरम्यान या कालावधीत प्रवासी संख्येतही ६.६२ लाखांची वाढ झाली असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे.



एसटी महामंडळाने २५ जानेवारीपासून तिकीट दरामध्ये १४.९५ टक्क्यांची वाढ लागू केली आहे. ही भाडेवाढ लागू होण्यापूर्वी महामंडळाला १० ते २४ जानेवारी या पंधरा दिवसांत ३३६ कोटी ४८ लाख इतके उत्पन्न मिळाले होते, तर भाडेवाढीनंतरच्या १५ दिवसांत म्हणजे २५ जानेवारी ते ८ फेब्रुवारीपर्यंत ३८८ कोटी १९ लाख रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

महामंडळाने भाडेवाढ केल्याने उत्पनामध्ये वाढ झाली असली तरी ती अपेक्षित असल्याप्रमाणे नाही आहे, तसेच उत्पन्नातील वाढ कायम ठेवण्यासाठी पुरेशा गाड्या उपलब्धता असणे गरजेचे आहे. नोव्हेंबरनंतर येणाऱ्या नवीन स्वमालकीच्या २६४० पैकी आतापर्यंत फक्त २३८ गाड्या पुरवठादार कंपनीने दिल्या आहेत. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून गाड्या ताफ्यात लवकर येण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. **– श्रीरंग बरगे, सरचिटणीस, एसटी कर्मचारी काँग्रेस**

# अतिवृष्टीचे अनुदान आलंय की नाही? मोबाईलवर जाणून घ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४नागपूर:–** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून निविष्ठा अनुदान प्रदान केले जात आहे. याअंतर्गत हजारो शेतकरी लाभार्थी ठरले असून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

सध्या, ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदान वितरित केले जात आहे. जवळपास पाच लाख शेतकऱ्यांना सुमारे ५९४ कोटी रुपयांचा निधी वितरित केला जाणार आहे. जानेवारी महिन्यात देखील या योजनेअंतर्गत निधीचे वितरण करण्यात आले होते. मात्र, अनेक शेतकरी अद्याप अनुदानापासून वंचित आहेत.

जर तुम्ही ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केली असेल आणि अनुदानाच्या प्रतीक्षेत असाल, तर खालील सोप्या पद्धतीने आपल्या अनुदानाची सद्यस्थिती तपासू शकता. यासाठी तुम्ही महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://mh.disastermanagement.mahait.org/PaymentStatus) भेट द्या. त्यानंतर आपल्या अर्जाचा विशिष्ट क्रमांक संबंधित ठिकाणी प्रविष्ट करा. तसेच नंतर ड्ठारीलह पर्यायावर क्लिक करा. काही क्षणांतच आपली पेमेंट स्थिती स्क्रीनवर दिसेल.पेमेंट वितरित झाले असल्यास त्यामध्ये पेमेंटची रक्कम, वितरणाची तारीख, आणि संबंधित बँकेची माहिती उपलब्ध असेल. तसेच पेमेंट होल्डवर असल्यास, त्यासंबंधित कारणे देखील दर्शवली जातील. जर आपले अनुदान अद्याप वितरित झाले नसेल किंवा पेमेंट तपशील उपलब्ध नसेल, तर संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा अशी सूचना देण्यात येते. पेमेंट वितरित झाले असल्यास त्यामध्ये पेमेंटची रक्कम, वितरणाची तारीख, आणि संबंधित बँकेची माहिती उपलब्ध असेल. तसेच पेमेंट होल्डवर असल्यास, त्यासंबंधित कारणे देखील दर्शवली जातील. जर आपले अनुदान अद्याप वितरित झाले नसेल किंवा पेमेंट तपशील उपलब्ध नसेल, तर संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा अशी सूचना देण्यात येते. खर म्हणजे,अनुदान प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्यासाठी ही पद्धत राबवली जात आहे.

# सदस्यता मोहिमेनंतर भाजपमध्ये संघटनात्मक निवडणुका

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४नागपूर : –** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता राज्यपातळीवर दीड कोटी नवीन सदस्यांच्या नोंदणीवर भाजपकडून भर देण्यात येत आहे. ही मोहीम संपल्यावर पक्षात संघटनात्मक निवडणुका घेण्यात येणार आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

गुरुवारी बावनकुळे यांनी नागपुरात पक्ष सदस्यता नोंदणीचा आढावा घेतला. यावेळी कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण हेदेखील उपस्थित होते. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी विधानसभा निवडणुकीनंतर लगेचच संघटनात्मक निवडणुका सुरू करण्याची परवानगी दिली होती. कार्यकर्त्यांच्या मदतीने १ कोटी ५१ लाख नवीन सदस्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. ४० दिवसांत एक कोटी दहा लाख सदस्यांची नोंदणी झाली आहे. १८ मार्चपर्यंत ४० लाखांहून अधिक सदस्य जोडले जातील. त्यानंतर संघटनात्मक निवडणुका होतील, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, गुरुवारी झालेल्या बैठकीत प्रत्येक कार्यकर्त्याला ५० ते १०० नवीन सदस्य बनवण्याचे लक्ष्य देण्यात आले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पंचायतीतून संसदेपर्यंत जाण्याचे लक्ष्य लक्षात घेऊन नवीन सदस्य बनवण्यात यावे, असे आवाहन केले. जगनाडे चौकातील एका हॉटेलमध्ये ही बैठक झाली. यात प्रामुख्याने पूर्व विदर्भातील पदाधिकारी सहभागी झाले होते. प्रत्येक बूथवर किमान २०० सदस्य आणि प्रत्येक कार्यकर्त्यामागे ५० ते १०० सदस्य करणे आवश्यक आहे. बूथ कार्यकर्त्यापासून ५० सदस्य बनवणारा कार्यकर्ताच राष्ट्रीय स्तरावरील अधिकारी होऊ शकतो, असे सांगण्यात आले. बावनकुळे आणि कार्याध्यक्ष चव्हाण यांनी पूर्व विदर्भातील सदस्यत्वाचे लक्ष्य गाठणाऱ्या १० विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# स्मार्ट मीटर विरोधात शिवसेनेची विद्युत कार्यालयावर धडक

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचा विजवितरण कपंनीला आंदोलनाचा ईशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव शहरात व तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम तात्काळ थांबविण्यात यावी अन्यथा अधिकाऱ्यांना कोंडू असा ईशारा देत शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेकडो ग्राहक महिलांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देऊन उप कार्यकारी अभियंता पिंगे यांना घेराव करून निवेदन सादर केले.



### अन्यथा विज कर्मचाऱ्याना कोंडू

महावितरण कपंनी वीज चोरी रोखण्यासाठी हे मीटर बसवित असल्याचा दावा करित आहे परंतु हे स्मार्ट मीटर गरिबांचं दिवाळ काळणार असल्याचा आरोप प्रकाश मारोटकर यांनी केला

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात व शहरात फॉल्टी मीटर असल्याच्या नावावर जुने मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसविण्याचा धडाका वीज वितरण कपंनीने सुरु केला असुन सदर मीटर कपंनी मार्फत मोफत बसवीन्यात येत असल्याचे ग्राहकांना खोटे सांगून नवीन स्मार्ट मीटर बसवीत आहे वास्तविक सदर बसविलेल्या मीटर ची वसुली हि पुढे येणाऱ्या बिलात वीजदर वाढवून बिलातून वसूल करणार आहे तसेच स्मार्ट मीटर हे गोर गरीब नागरिकांना न परवडणारे असुन आधी पैसे भरा मग वीज वापरा अशी प्रक्रिया लागू होणार आहे शिवाय सर्व व्यवहार मोबाईल आणि बँक खाते द्वारे करावे लागणार असल्याने ग्रामीण भागातील गरीब ग्राहकांना अडचणीचा सामना करावा लागणार आहे त्यामुळे तात्काळ स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम बंद करावी अन्यथा मीटर बसविन्या करिता येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोंडू असा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी दिला यावेळी माजी नगरसेवक निलेश इखार वासुदेवराव लोखंडे माजी उपसभापती रेखाताई नागोलकर,सुनील गुरमुळे,महादेव सोनवणे,चेतन डकरे,नितीन दुधे,सुमित लोमटे,गुणवंत चांदुरकर, पवन डोफे,गजानन कोळमकर, रवी ठाकूर, प्रकाश ब्राह्मणवाडे, निलेश कुकडे, निलेश इंगोले, प्रेम हिवराळे,अक्षय हिवराळे, अनिकेत गटुले, निलेश मारोटकर, श्याम झीमटे,भूमेश्वर गोरे,संजय डोक,शुभम रावेकर,अतुल खंडाते, नामदेव शिरभाते, लीलाधर चौधरी,नीरज लोमटे,चेतन पुंड,क्रिष्णा सपकाळ, गजानन लोमटे,निलेश हळदे अक्षय नागोलकर,अनिता भंडारे वनिता काळबांडे,शशिकला आमडारे, शारदा सोनोने,मीना सोनवणे इत्यादी उपस्थित होते

# रविवारी राज्य शिक्षक संघाचे जिल्हा अधिवेशन : हजारो शिक्षक सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी राज्य शिक्षक संघटना सदैव कार्यरत असते. शिक्षकांचे हक्क, न्याय व अधिकारासाठी संघटना लढा देत असते. संघटना अधिक बळकट करण्यासोबतच व शिक्षकांना संघटित करण्यासाठी अमरावती विभागातील शिक्षक राज्य शिक्षक संघाचे एकदिवसीय अमरावती जिल्हा अधिवेशन येत्या रविवार १६ तारखेला अभियंता भवन शेगांव नाका येथे आयोजित करण्यात आले आहे.

संघटनेचे कार्य व अधिवेशनाची माहिती आज शुक्रवारी (१४) स्थानिक राजापेठ येथील अमरावती श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेतील संस्थापक अध्यक्ष व माजी सिनेट सदस्य दिलीप कडू यांचे पदाधिकाऱ्यांनी दिली. राज्य शिक्षक संघ सदैव शिक्षकांच्या पाठीशी उभे असतो. शिक्षकांच्या विविध प्रश्नासाठी आतापर्यंत संघटनेने



विविध आंदोलने धरणे, निदर्शने केली असून स्थानिक व मंत्रालय पातळीवर शिक्षकांच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. येत्या रविवारी संघटनेचे विभागीय अधिवेशन होत आहे. राज्याचे माजी शिक्षण सहसंचालक संजय गणोरकर यांच्या हस्ते सकाळी १० वाजता अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्य शिक्षक संघाचे मार्गदर्शक संजय खोडके उपस्थित राहणार आहेत.राज्य शिक्षक संघाचे राज्याचे अध्यक्ष दिलीप कडू, नुटाचे अमरावती जिल्हा अध्यक्ष महेन्द्र मेटे, विजुक्टाचे विभागीय मार्गदर्शक अरविंद मंगळे, अरुणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंतराव लुंगे, राज्य शिक्षक संघाचे राज्य सचिव भोजराज काळे, अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रवीण दिवे, उर्दू शिक्षक असोसिएशनचे अध्यक्ष जहरोश गाजी, मेस्टाचे अमरावती जिल्हाध्यक्ष संदीप गावंडे, विदर्भ मुख्याध्यापक संघाचे उर्दू शिक्षक संघाचे अध्यक्ष काजी मो. वजाहत अली गाजी अधिवेशनास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.या अधिवेशनात तीन महत्त्वाचे ठराव पारित करण्यात येणार आहेत. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यासाठी राज्य शिक्षक संघाच्या वतीने शासन स्तरावर लढा उभारण्यात यावा, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती वरील बंदी उठवण्याबाबत शासनाने तात्काळ कार्यवाही करावी, २४ वर्षांच्या सेवेनंतर सर्व शिक्षकांना सरसकट निवड श्रेणी लागू करणे तसेच १०,२०,३० ची कालबद्ध पदोन्नती मंजूर करावी असे तीन ठराव पारित करण्यात येणार आहे..या तीन महत्वाच्या ठरावासह शिक्षकांच्या हिताच्या अनेक विषयांवर अधिवेशनात चर्चा होणार असून शिक्षकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी राज्य शिक्षक संघ कोणते मार्ग अनुसरेल याबाबत सविस्तर माहिती दिली जाणार आहे. जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने अधिवेशनास उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य शिक्षक संघाच्या वतीने पत्र परिषदेत करण्यात आले.पत्र परिषदेला भोजराज काळे, अनिल भारसाकळे, ललित चौधरी, नंदकिशोर नवरे, श्रीकांत कडू व संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# समाजकंटक राहुल सोलापूरकर याच्यावर गुन्हे दाखल करा

## चांदूर बाजार मध्ये शिवशक्ती-भिमशक्ती आक्रमक : तहसीलदार व ठाणेदारांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चांदूर बाजार**

समाजकंटक राहुल सोलापूरकर याच्यावर गुन्हे दाखल करून अटक करा या मागणी साठी शिवप्रेमी व आंबेडकर अनुयायी यांनी चांदूर बाजार तहसीलदार व ठाणेदारांना निवेदन देऊन मागणी केली छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल समाज कंठक राहुल सोलापूरकर याने अपमानकारक शब्द वापरल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा समाजकंटक राहुल सोलापूरकर



यानेे एका पॉडकास्ट मध्ये छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेले विधान अतिशय अक्षेपार्थ आहे त्यामुळे समजात भावना दुखावल्या गेल्या समाजकंटकाला महाराजांबद्दल द्वेष आहे यासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अपमानास्पद विधान केले आहे त्यामुळे देशद्रोही सारखे गुन्हे दाखल करण्यात यावे अशे निवेदना मध्ये नमूद करण्यात आले समाज कंटकावर तात्काळ गुन्हे दाखल करून त्याला अटक करण्यात यावे अशी मागणी तहसील कार्यालयात व पोलीस स्टेशन मध्ये धडक देऊन करण्यात आली यावेळी राजू तंतरपाळे, विकि राठी , सचिन तायवाडे , अक्षय मेश्राम ,गौतम खडारे ,सुमित नींभोरकर ,संदीप वानखडे,गौरव भोवते, विजय सरवटर ,सागर शिगाडे ,पंडित भूले, वैभव तिखिले ,राम यावले सह आदी आंबेडकर-शिवप्रेमी उपस्थित होते.

### झालेला अपमान सहन करणार नाही

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल केलेलं वादग्रस्त वक्तव्याचा जाहीर निषेध करतो समाजाच्या भावना दुखावणाऱ्या राहुल सोलापूरकर याला कठोर शिक्षा देण्यात यावी झालेला अपमान सहन करनार नाही.

**–राजू तंतरपाळे**
**(भाजपाअनुसूचित जाती मोर्चा तालुका अध्यक्ष)**
**चांदूर बाजार**

# उद्याला वन अधिकारी व वन कर्मचाऱ्यांचे पहिले राज्यव्यापी भव्य अधिवेशन


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मोर्शी**

वन अधिकारी व वन कर्मचाऱ्यांचे पहिले राज्यव्यापी भव्य अधिवेशन व सत्कार समारंभाचे आयोजन दिनांक १५ फेब्रुवारी रोजी अमरावती येथील वसंत मुख्यालय येथे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यव्यापी अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अप्पर प्रधान वनसंरक्षक तथा संचालक चंद्रपूर वन प्रशासन एम श्रीनिवास रेड्डी, प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, तसेच राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे, अमरावती लोकसभा मतदार संघाचे खासदार बलवंत वानखडे, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा,आमदार प्रताप अडसड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष संजय खोडके, अखिल भारतीय वन अधिकारी महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष जयदीप सिंग कुमारा, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष अशोक दगडे, महाराष्ट्र राज्य राज्यपत्री वन अधिकारी महासंघ नागपूरचे कार्याध्यक्ष अतुल देवकर, फॉरेस्ट रेंजर असोसिएशन नागपूरचे अध्यक्ष निलेश गावंडे, वनरक्षक पदोन्नत वनपाल संघटना नागपूरचे अध्यक्ष अजय पाटील, महाराष्ट्र राज्य वन सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर शेळके, कास्टइब संघटनेचे उपाध्यक्ष प्रभाकर सोनडवले प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला सत्कारमूर्ती म्हणून वनबल प्रमुख श्रीमती शोभिता विश्वास, एम श्रीनिवास रेड्डी( चंद्रपूर ),श्रीमती ज्योती बॅनर्जी (अमरावती), आदर्श रेड्डी अमरावती, सुमंत सोळंके चिखलदरा, सुनील वाकोडे,भूषण देशमुख, योगेश तापास, सय्यद सलीम इत्यादींचा सत्कार करण्यात येणार आहे. या अधिवेशनात २९ प्रमुख मागण्यावर चर्चा करण्यात येणार आहे. तरी सदर अधिवेशनाला राज्यातील वन अधिकारी, व वन कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बहुजनाय वनविभाग अधिकारी कर्मचारी संघटना तथा अखिल भारतीय वन अधिकारी महासंघ नवी दिल्ली च्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# गो.सी. टोम्पे महाविद्यालयात वित्तीय साक्षरता या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ चांदुर बाजार**

चांदूरबाजार येथील गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे एनएसडीएल अँड मिनिस्ट्री ऑफ फायनान्स यांच्या अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या मार्केट का एकलव्य कार्यक्रमात वित्तीय साक्षरता या विषयावर एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री प्रथमेश गुप्ता यांनी वित्तीय



घोटाळे विषयी जागरूकता, सायबर वित्तीय घोटाळा टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, गुंतवणूक व कराशी संबंधित माहिती, स्वयं वित्तीय पद्धत अशा विविध विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील ४०० पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थिनींनी ऑनलाइन नोंदणी केली व या कार्यशाळेचा लाभ घेतला. वित्तीय साक्षरता याविषयी माहिती जाणून घेऊन त्यांचा आपला परिवार आणि आपल्या परिसरात अशी फसवणूक कोणाची होणार नाही किंवा ऑनलाईन फसवणुकीला कोणीही बळी पडला नाही पाहिजे याची दक्षता घेण्यात येईल व इतरांनाही यासंबंधी जागृत करण्याची विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. कार्यशाळेमध्ये प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, डॉ. जयंत बनसोड, डॉ. अनुज धाबलिया, डॉ. प्रवीण खोडे, प्रा.कु. समीक्षा देशमुख आणि महाविद्यालयातील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सर्वोत्कृष्ट शरीरयष्टी (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

श्री संकराचार्य युनिव्हसिटी ऑफ संस्कृत कलडी, केरळ येथे ०७ ते ०९ मार्च, २०२५ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सर्वोत्कृष्ट शरीरयष्टी (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला असून चमूचा प्रशिक्षण वर्ग विद्यापीठाच्या क्रीडा संकुलामध्ये दि. २७ फेब्रुवारी ते ०३ मार्च, २०२५ दरम्यान होणार आहे.

चमूमध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाचा निखिल उके व वैभव बुंदेले, आर. ए. महाविद्यालय, वाशीमचा सोहेल खान, श्रीमती नानकीबाई वाधवाणी महाविद्यालय, यवतमाळचा श्रीकांत लोणबैळे, नथमल गोयंका विधी महाविद्यालय, अकोलाचा कृष्णा बागेरे, श्रीमती एस. आर. महाविद्यालय, वणोजाचा पंकज मुराई, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोटचा मोहम्मद मुद्दसीर, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा बॉबी साहू आणि व्ही. एन. महाविद्यालय, मंगरुळपीरचा अजय रावपलाई यांचा समावेश आहे.

# मेळघाट बर्ड काऊंटचे (पक्षी सर्वेक्षण) सेमाडोह येथे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

मेळघाट हा भारतातील एक सर्वात जुना आणि आकाराने सर्वात मोठा असा व्याघ्र प्रकल्प आहे. मागील २०२३-२४ मध्ये या व्याघ्र प्रकल्पाने आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. सातपुडा पर्वत रांगेतील एक सर्वात संपन्न जंगल असलेला मेळघाट हे उंच पहाडी व दऱ्या-खोऱ्यांनी युक्त असा प्रदेश आहे. सुमारे ३००० चौरस किमी इतका विस्तार असलेल्या मेळघाटात विविध प्रकारचे अधिवास आढळत असले तरी येथील जंगल हे शुष्क पानगळी प्रकारचे आहे. अधिवास विविधतेमुळे येथील पक्षी विविधता सुद्धा संपन्न आहे. या पक्षी विविधतेचा अभ्यास करण्यासाठी मेळघाटात दि. १३ ते १६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान चार दिवसीय बर्ड काऊंटचे (पक्षी सर्वेक्षण) आयोजन करण्यात आले आहे.या तिसऱ्या बर्ड काउंटचे आज दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सेमाडोह येथे उद्घाटन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेळघाटचे विभागीय वनाधिकारी श्री मनोजकुमार खैरनार यांची



उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानद वन्यजीव रक्षक तथा पक्षी अभ्यासक डॉ. जयंत वडतकर तसेच सहा. वनसंरक्षक श्री वैभव घार्गे (सिपना) , सहा. वनसंरक्षक श्री. पद्माकर मोगरे (गुगामल), व सहा. वनसंरक्षक श्री राजेश रत्नपारखी (मेळघाट वन्यजीव) यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक वनसंरक्षक श्री वैभव घार्गे यांनी केले. त्यानंतर मेळघाट पक्षी विश्वाचे अभ्यासक डॉ. जयंत वडतकर यांनी मेळघाटातील पक्ष्यांच्या अभ्यासाचा इतिहास, मेळघाटची पक्षी जैवविविधता तसेच इबर्ड ट्रीप रिपोर्ट या बाबत आपल्या सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. विभागीय वनाधिकारी श्री मनोजकुमार खैरनार यांनी सर्व सहभागींचे स्वागत करून मेळघाटच्या या पक्षी अभ्यास कार्यक्रमातून मेळघाटच्या पक्षी विविधतेवर आणखी प्रकाश टाकला जाऊन येथील पक्षी विश्वात आणखी प्रजातींची भर पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी राजपूत यांनी केले. आयोजन समिती सदस्य श्री अतुल तिखे यांनी आभार प्रदर्शन केले.या सर्वेक्षण कार्यक्रमात चार राज्यातील सुमारे ५० पक्षी अभ्यासक सहभागी झाले असून व्याघ्र प्रकल्पातील गुगामल, सिपना व मेळघाट वन्यजीव विभागातील सुमारे २५ कॅम्प वर हे पक्षी अभ्यासक उद्घाटन कार्यक्रम आटोपल्यानंतर रवाना झालेत. पुढील तीन दिवस पक्षी नोंदणी करून व त्याची माहित संकलित करून दि. १६ तारखेला या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.सदर कार्यक्रमाच्या आखणीसाठी डॉ. जयंत वडतकर, किरण मोरे, प्रा.डॉ चेतना उगले, मनिष ढाकुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

यापूर्वी जानेवारी २०२३ मध्ये पार पडलेल्या पहिल्या पक्षी नोंदणी कार्यक्रमात मेळघाटच्या यादीत ११ नवीन पक्ष्यांची भर पडली होती. तसेच दुसऱ्या बर्ड सर्व्हे मध्ये सुद्धा दोन पक्ष्यांची नव्याने नोंद झाली होती. मेळघाटचे पक्षीविश्व संपन्न आहे. या ठिकाणी आजवर ३०८ पक्षी प्रजातींची नोंद झाली असून यामध्ये अनेक दुर्मिळ व महत्वपूर्ण पक्षी प्रजातींचा समावेश आहे. सध्या हिवाळ्याचा अखेरचा काळ असल्याने स्थलांतरित पक्षी परतीच्या मार्गावर लागण्याची ही वेळ आहे. सातपुडा हा स्थलांतरासाठीचा महत्वाचा भ्रमणमार्ग असल्याने काही महत्वाच्या प्रजातींची त्यांच्या प्रवासादरम्यान नोंदी होण्याची सुद्धा शक्यता आहे.

**डॉ. जयंत वडतकर, मेळघाट पक्षी विश्वाचे अभ्यासक तथा मानद वन्यजीव रक्षक.**

# होळीला मोफत साडी

## लवकरच मिळणार लाभ : साडीचा दर्जा महत्त्वाचा, एका कुटुंबातील एकालाच लाभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

पुरवठा विभागाच्या माध्यमातून होळी सणानिमित्त अंत्योदय कार्डधारक महिलांना मोफत साडीचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील हजारो महिला पात्र ठरल्या आहेत.

राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून शिधापत्रिकाधारकांना चैत्र पाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी-गणपती आणि दिवाळी या सणानिमित्त स्वस्त धान्य व आनंदाचा शिधा वाटप केला जातो. मागील वर्षीपासून होळी सणानिमित्त अंत्योदय शिधापत्रिकाधारक महिलांना मोफत साडी दिली जात आहे. मात्र, गतवर्षी लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे साडी वाटप रखडले होते. निवडणुकीनंतर टप्प्याटप्याने साडी वाटप करण्यात आले. मात्र, हलक्या प्रतीच्या साड्या मिळाल्याने महिलांमधून नाराजीचा सूरही उमटला होता हे विशेष.

### वस्त्रोद्योग महामंडळाकडून या साड्या पुरवल्या

वस्त्रोद्योग महामंडळाकडून या साड्या पुरवल्या जाणार आहे आणि पुरवठा विभाग त्यांचा स्वस्त धान्य दुकानातून पुरवठा करणार आहे. या साड्यामध्ये काही खराबी असेल तर त्या मागे घेऊन तशी शासनाला माहिती कळवली जाणार आहे. बहिणींना या साड्या बाबत चॉईस असणार नाही. ज्या महामंडळ देईल त्याचं स्वीकाराव्या लागणार आहेत.

### प्राधान्य गटातील महिलांना मिळणार नाही लाभ !

धान्य व आनंदाच्या शिधासाठी पात्र असलेल्या प्राधान्य कुटुंब कार्डधारक महिला मोफत साडीपासून वंचित राहणार आहेत. 'अंत्योदय' त्या महिलांना साडी, मग आम्ही लाडक्या बहिणी नाही का, असा प्रश्न इतर महिलांनी उपस्थित केला.

# कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी साधला शेतकऱ्यांशी संवाद

## शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून उपाययोजनांवर भर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे प्रगतिशील व प्रयोगशील शेतकऱ्यांशी संवाद साधला. नियोजन भवन येथे कृषी विभागाच्या वतीने आयोजित परिसंवादात त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर उपाययोजना सुचवल्या. या संवादादरम्यान कडधान्य, औषधी वनस्पती, संत्रा, मोसंबी, सोयाबीन, हळद, मिरची, केळी, पपई, कापूस आणि बीजोत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसह कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. शेतकऱ्यांनी हवामान बदल, पीक विमा, सिंचन सुविधा, बाजारभावातील चढउतार यांसारख्या समस्यांवर आपली मते मांडली. कृषिमंत्री कोकाटे यांनी या समस्या गांभीर्याने घेत तात्काळ उपाययोजनांची हमी दिली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत आहे. पिकांच्या हमीभावाबाबत निर्णय घेतला जाईल तसेच शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाईल, असे ते म्हणाले. या दौऱ्यात कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोफत मिळालेला रेशनचा तांदूळ २५ रुपये किलोने विकला जात आहे खुल्या बाजारात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

रेशनकार्डवर मोफत मिळणारा तांदूळ लाभार्थीकडून २२ ते २५ रुपये किलो दराने व्यापाऱ्यांना विकून पैसा वसूल केला जात असल्याची गंभीर बाब पाहणीतून समोर आली आहे. मात्र, याकडे रेशन दुकानदार व पुरवठा विभागाचे दुर्लक्ष होत आहे.



अमरावती शहरासह ग्रामीण भागात तांदूळ खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात फिरतांना आढळतात.प्राधान्य गट, अंत्योदय व एपीएलशिधापत्रिकाधारकांना मोफत तांदूळ, गहू याव्यतिरिक्त अंत्योदय शिधापत्रिका धारकांना साखर मिळते. मात्र, साखर अंत्योदय लाभार्थ्यांना अनेक महिन्यांपासून मिळणे बंद आहे.मोफत तांदूळ योजना राबविण्यात येत असल्याने ही योजना थेट व्यापाऱ्यांच्या पथ्यावर पडली आहे. मोफत तांदूळ व्यापाऱ्यांना २२ ते २५ रुपये किलो या भावात विकला जात असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. या प्रकाराची संबंधित विभागाने चौकशी करण्याची गरज आहे.मात्र तसे कुठेही होतांना दिसून येत नाही.

# अचलपूर नगरपालिकेत ९ कोटींच्या ४७ कामांचे 'व्यवस्थापन' करण्यावर मोठा दबाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अचलपूर**

नगरपालिकेत दलित विकास आणि विविध निधीच्या विकास कामांच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या राजकीय हस्तक्षेपाचा आरोप होत आहे. काही ठेकेदारांनी प्रामाणिकपणे आपले ऑनलाइन टेंडर सबमिट केले असले तरी काही लोकप्रतिनिधी आणि त्यांचे समर्थक निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप करत असल्याची माहिती समोर येत आहे.

ठेकेदारांवर दबाव तंत्राचा वापर

लोकप्रतिनिधींच्या निकटवर्तीयांनी आणि त्यांच्या पीएंनी वेगवेगळ्या एजन्सींवर दबाव टाकून त्यांना स्पर्धेतून माघार घेण्यास भाग पाडल्याचे ठेकेदार सांगत आहेत. काहींना तर थेट फोनद्वारे किंवा मेसेजद्वारे स्पर्धेतून बाहेर पडण्याचे सूचित केले जात असल्याचे आरोप आहेत.

**पूर्व राज्यमंत्र्यांच्या कार्यकाळात मिळालेली मंजुरी आणि नवीन टेंडर प्रक्रियेतील अडथळे**



या ४७ कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी पूर्व राज्यमंत्र्यांच्या कार्यकाळात मिळाली होती. एकदा टेंडर प्रक्रिया राबवली गेली होती, परंतु नवीन मुख्याधिकारी रुजू झाल्यानंतर ती रद्द करून पुन्हा नवीन टेंडर मागवण्यात आले.

नगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र ही बाब फेटाळली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील टेंडर रद्द करण्याचे कारण तांत्रिक चूक होती. राज्य पीडब्ल्यूडीच्या नियमानुसार, डिप्लोमा आणि इंजिनियर धारकांना अर्नेस्ट मनी (जामीन रक्कम) जमा करण्याची गरज नसते. मात्र, हे नियम नगरपालिकेस लागू नसताना, चुकून त्याचा उल्लेख जाहिरातीत करण्यात आला. त्यामुळे टेंडर पुन्हा मागवावे लागले.

**नवीन टेंडर प्रक्रिया आणि नवीन आरोप**

दुसऱ्यांदा मागवण्यात आलेली टेंडर प्रक्रिया २२ जानेवारी रोजी उघडली जाणार होती. पण काही खास लोकांना कामे मिळावीत म्हणून टेंडर प्रक्रिया न उघडण्याचा प्रयत्न केल्याची कुजबूज ठेकेदारांमध्ये सुरू आहे.

नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, या ४७ कामांसाठी प्रत्येकी सहा ते सात एजन्सींनी रस दाखवला आहे. २२ जानेवारी रोजी टेक्निकल बिड ओपन करण्यात आली असून सध्या त्याच्या तपासणीची प्रक्रिया सुरू आहे. पात्र एजन्सींच्या निवडीनंतरच त्यांच्या आर्थिक बोली उघडल्या जातील.

**सत्ताधाऱ्यांकडून आरोप फेटाळणी**

सत्ताधारी गटाने हे सर्व आरोप फेटाळले असून, योग्य पद्धतीने काम वाटप होत असल्याचे सांगितले आहे. त्यांच्या मते, काही ठेकेदारांना आधीच मोठी कामे दिली गेली असून, जास्त अपेक्षा ठेवणे योग्य नाही. उदाहरणार्थ, एका ठेकेदाराला २८ लाखांचा सार्वजनिक शौचालय प्रकल्प दिला गेला आहे, तर तोच ठेकेदार ३५ लाखांची सीमेंट रस्ता देखील मागत आहे, जे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही.

**ठेकेदारांचे दोन गट आणि पुढील प्रक्रिया**

सध्या नगरपालिकेत ठेकेदार दोन गटांत विभागले गेले आहेत - एक गट कपबशीचा तर दुसरा फुलवाल्यांचा. एकूण ३२९ ठेकेदारांनी ४७ कामांसाठी निविदा भरल्या आहेत.

आता टेंडर प्रक्रियेचे अंतिम निकाल कधी लागतील आणि कोणत्या ठेकेदारांना कोणती कामे मिळतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नव्या मुख्य अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीमुळे नगरपालिकेत सध्या गोंधळाचे वातावरण आहे.

# राष्ट्रवादीच्या नेत्याला लागली होती मृत्यूची चाहूल? वर्षभरापूर्वीच पुस्तकामध्ये लिहून ठेवले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अकोला**

विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी अध्यक्ष, मूर्तिजापूरचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रा. तुकाराम बिडकर यांचे गुरुवारी अपघाती निधन झाले. तुकाराम बिडकर यांना वर्षभरापूर्वीच आपल्या मृत्यूची चाहूल लागली होती का? अशी आता चर्चा सुरू झाली आहे. त्याचे कारणही तसेच आहे. वर्षभरापूर्वी त्यांनी लिहिलेल्या पुस्तकात मृत्यूवर त्यांनी भाष्य केले. जन्मभूमीतच मरण येऊ दे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे त्यांनी नमूद करून 'मन मरे माया मरे। मरमर गये शरिरआशा तृष्णा ना मरे। कह गये दास कबीर'अशा संत



कबीरांच्या दोह्यांनी तुकाराम बिडकर यांनी पुस्तकाचा शेवट केला होता.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेण्यासाठी गेले असता अपघातात प्रा. तुकाराम बिडकर व त्यांचे सहकारी राजदत्त मानकर यांचा मृत्यू झाला. दरम्यान, वर्षभरापूर्वी 'माझं गाव, माझ्या आठवणी' या पुस्तकात तुकाराम बिडकर यांनी आपल्या मृत्यूवर लिखाण केले आहे.

तुकाराम बिडकर यांनी लिहिले की, 'हे ईश्वरा मला मृत्यू जन्मभूमीतच दे. माझ्या गावकऱ्यांच्या खांद्यावरून मला शेवटच्या यात्रेला निघू दे. माझे पार्थिव गावातच आणा. जय बजरंग विद्यालयाच्या मैदानात ठेवावे, तेथे श्रमदान करून माझे नेते शरदचंद्र पवार यांच्या कार्यक्रमासाठी व्यासपीठ उभारले होते. त्याच ठिकाणी माझे पार्थिव ठेवा. बी.पी.एड. कॉलेजच्या मैदानावर एका कोपऱ्यात माझ्यासाठी एक जागा ठेवा. तिथेच मला मुलगा पवन याच्या हातून अग्नी द्या. कोणताही विधी करू नका. माझी राख इतरत्र कोठेही नेऊ नका, ती लोणार नदीत विसर्जित करा. ओंकारेश्वर हे माझं अत्यंत श्रद्धेचं ठिकाण. माझ्या अस्थी नर्मदा मातेच्या उदरात विसर्जित करा. काही राख जय बजरंग विद्यालयाच्या मैदानात टाका, जेणेकरून माझ्या शाळेचे, मंडळाचे खेळाडू त्यावर खेळतील आणि मला त्यातून आनंद मिळेल.

**ही इच्छा अपूर्ण राहिली**

तुकाराम बिडकर यांनी पुस्तकात एक इच्छा व्यक्त केली होती. 'दुःख नाही पण माझ्या हुकलेल्या जि.प. अध्यक्ष पदावर अन क्रीडा मंत्री पदावर गावातलं कुणी तरी बसलेलं मला पहायचं आहे. सिनेमाच्या, कलावंताच्या क्षेत्रातही मी खूप प्रयत्न केले, पण त्या उंचीपर्यंत जाता आल नाही. पण गावातील कुणी त्या उंचीवर पोहचलेला मला पाहायचं आहे,' असे त्यांनी पुस्तकात नमूद केले होते. मात्र, ती इच्छा अपूर्ण राहिली.

# झिमेलिया गुलाबांची युवांना भुरळ : व्हॅलेंटाइन दिन विशेष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

जीवापाड प्रेम असलेल्या व्यक्तीसमोर प्रेमाची अभिव्यक्ती करण्यासाठी प्रियकर- प्रेयसीला व्हॅलेंटाइन दिनाची प्रतीक्षा असते. हा दिवस केव्हा उजाडेल यासाठी त्यांचे मन आसुसते. शुक्रवार, १४ फेब्रुवारीला असलेल्या व्हॅलेंटाइन दिनानिमित्त शहरातील फूल बाजारही गर्दी दिसून आली.

येथे झिमेलिया यासारखी गुलाबपुष्पे खरेदी करण्यासाठी तरुणाईची झुंबड होती. मनातील प्रेम व्यक्त करणे व प्रेमाची पारख झाल्यानंतर ते अधिक दृढ, वृद्धिंगत करण्यासाठी अनेकजण



व्हॅलेंटाइन दिनाचा मुहूर्त साधतात. व्हॅलेंटाइन दिनाच्या पूर्वसंध्येला येथील मुख्य मार्केट परिसरात अनेकजण गुलाबपुष्प खरेदी करताना दिसून आले. प्रियकर- प्रेयसीला खूश करण्यासाठी दुसऱ्या दिवशीची तयारी आदल्या दिवशीच दिसून आली.

**पर्पल, अबोली गुलाबही लक्षवेधक**

पांढरे, गुलाबी, लाल, पिवळे, पर्पल, अबोल यासह विविध प्रकारचे गुलाब लक्षवेधव होते. पुष्पगुच्छासह डेकोरेटेड गुलाब गुच्छ लक्ष वेधून घेत होते.

**हार्टशेप बलून, लव्ह कट आऊटचीही क्रेझ**

आपल्या प्रिय व्यक्तीला व्हॅलेंटाइन दिनी भेट देण्यासाठी हार्टशेप बलून व लव्ह कट आऊट खरेदी करण्यावरही तरुणाई भर देत होती.

**३० रुपयाच गुलाबपुष्प बुके २ हजारांपर्यंत**

फूल बाजारात साधे गुलाबपुष्प ३० रुपयांत विक्री केले जात होते, तर डेकोरेटिव्ह गुलाबाचे बुके ५०० रुपयांपासून २ हजार रुपयांपर्यंत विक्री करताना दिसून आले. याला अनेकजण पसंतीही दर्शवित होते. त्यानुसार मागणी करीत होते. सकाळपासूनच गुलाबांच्या खरेदीची लगबग होती.

# शेगावात 'श्रींच्या' प्रगटदिन उत्साहाचा महारूद्र यज्ञाने श्रीगणेशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४शेगाव**

विदर्भाची पंढरी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज संस्थानमध्ये 'श्रीं'चा प्रगट दिन उत्सव यंदा २० फेब्रुवारीला पारंपरिक उत्साहात व लाखावर भाविकांच्या साक्षीने साजरा करण्यात येणार आहे.

गुरुवारी, १३ फेब्रुवारी महारूद्र स्वाहाकार यज्ञ पुजन करुन या श्रींच्या प्रगटदिन उत्सवाला सुरुवात करण्यात आली आहे. प्रगट दिन उत्सवानिमित्त संत गजानन महाराज संस्थान मंदिरात आठ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. यादरम्यान सकाळी ५ ते ६ काकडा ,७.१५ ते ९ .१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० वाजेदरम्यान किर्तन पार पडणार आहे. १३ फेब्रुवारी अनंत बुवा कनवाडे.कळमुळा, १४ फेब्रुवारी वासुदेव बुवा कोलंबीकर. नायगांव बा, १५ फेब्रुवारी प्रशांत बुवा ताकोते.सिरसोली, १६ फेब्रुवारी अनंत बुवा बिडवे. बाशी, १७ फेब्रुवारी राम बुवा डोंगरे,



जाटनांदूर १८ फेब्रुवारी मयुर बुवा बोडखे श्री क्षैत्र देहू, १९ फेब्रुवारीला श्रीहरी बुवा वैणव जालना, तर २० फेब्रुवारी श्रीराम बुवा ठाकूर लातूर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. २० फेब्रुवारी २०२५ रोजी श्री संत गजानन महाराज प्रगटदिन असल्याने या दिवशी सकाळी १० ते १२ श्री भरत बुवा पाटील म्हैसवाडी याचे शेगावी श्रीच्या प्रगट्या निमित्य किर्तन होईल.

आज १३ फेब्रुवारी रोजी श्री महारूद्र स्वाहाकार यज्ञाचे पुजन बीड जिल्ह्यातील वेदमूर्ती ब्राह्मणवृंदाद्वारे करण्यात आले. आज श्रीच्या मंदिरात व सर्व परिसरात केळीच्या खांबाचे खुट व आंबाच्या पानाची तोरणे लावली आहे. श्री संस्थान मध्ये प्रगटदिन निमित्ताने श्रींच्या समाधी मंदिरावर आणि परिसरात पिवळ्या रंगाची विद्युत रोषणाई तर प्रवेशद्वारावर रंगीबेरंगी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.२० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता श्री महारूद्र स्वाहाकार यज्ञाची पुर्णाहूती होऊन अवभृतस्नान होईल. दुपारी ४ वाजता उत्सवांची पालखी अश्व, रथ, मेणासह परिक्रमा करीता निघेल. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ काल्याचे किर्तन श्रीराम बुवा ठाकरे लातूर यांच्या मधुर वाणीतून होऊन प्रगटदिन उत्सवाची सांगता होणार आहे. श्री प्रगटदिन उत्सावात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र, मध्येप्रदेश, या ठिकाणाहून भजनी दिंड्या दाखल होत आहे. गजानन अवलीया अवतरले जग ताराया, ज्ञानेबुवा तुकाराम नामघोष करित शेगांव शहरात भजनी दिंड्यांचे आगमन होण्यास सुरुवात झाली आहे.